बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १६३ वा | शुक्रवार दिनांक ०५ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## विकासकामे करताना सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्या;दिशा समितीच्या बैठकीत खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

धाराशिव, (जिमाका) जिल्ह्याच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून विविध योजना,प्रकल्प व उपक्रम राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात येतो.त्याचा उपयोग शाश्वत विकासासाठी करण्यात येतो.विकास योजनांची आखणी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधींचा सहभाग राहिल्यास योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने जनतेपर्यंत पोहोचू शकेल,यासाठी अधिकाऱ्यांनी कोणतेही विकासकामे करताना सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवून करावे.असे निर्देश खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित दिशा समितीच्या आढावा बैठकीत दिले.

यावेळी धाराशिव-कळंबचे आमदार कैलास घाडगे-पाटील,उमरगा- लोहाराचे आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शोभा जाधव,ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अनुप शेंगुलवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

खा.राजेनिंबाळकर पुढे म्हणाले की,

जनतेच्या हिताशी संबंधित प्रकल्पांची गतीमान अंमलबजावणी करताना पारदर्शकता व समन्वय याला प्राधान्य दिले पाहिजे.जिल्ह्यातील पायाभूत सुविधा,रस्ते,पाणीपुरवठा,राष्ट्रीय महामार्ग,रेल्वे मार्ग,आरोग्य आणि कृषी क्षेत्राशी संबंधित अनेक कामे प्राधान्याने सुरू आहेत.या कामांमध्ये जनतेच्या अडचणी दूर करण्यासाठी व तक्रारी कमी करण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने पावले उचलावी. जनतेचा विश्वास हा विकासाचा पाया आहे.सर्व पातळ्यांवर समन्वय साधूनच जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साध्य होईल.जिल्ह्यातील सर्व प्रकारची विकासकामे राबविताना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणे अत्यंत आवश्यक आहे. जनतेच्या हिताशी संबंधित कोणतेही काम पारदर्शकतेने व सर्वांचा सहभाग सुनिश्चित करूनच पूर्ण करण्यात यावे,असे त्यांनी सांगितले.

केंद्र शासनामार्फत जिल्ह्याला मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होत असल्याने सांगून श्री.राजेनिंबाळकर म्हणाले की,या निधीचा योग्य वापर करून शाश्वत व गुणवत्तापूर्ण विकास साधणे हे प्रशासनासमोर




मोठे आव्हान आहे.मात्र,यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची असून त्यांच्या मार्गदर्शनानेच विकासकामे प्रभावीपणे राबविता येतील.जनतेच्या समस्या प्रत्यक्ष ओळखून त्यावर उपाययोजना करणे हा लोकप्रतिनिधींचा अनुभव प्रशासनासाठी उपयुक्त ठरतो.त्यामुळे कोणतेही काम एकतर्फी न करता सर्व घटकांचा सहभाग असणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

खा.श्री.राजेनिंबाळकर म्हणाले की, जनतेला थेट लाभ होणाऱ्या योजनांना प्राधान्य देऊन त्या कामांची गती वाढवावी. तसेच,सुरू असलेल्या कामांमध्ये विलंब होणार नाही याची दक्षता घेणे प्रशासनाची जबाबदारी आहे.जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर राजकीय व प्रशासकीय समन्वय अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक प्रकल्पात जनतेचा विश्वास महत्त्वाचा असून, त्याच आधारे आपण अधिक परिणामकारक कामगिरी करू शकतो.या बैठकीत विविध विभाग प्रमुख,संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## कृषी यंत्रसामग्री, खते स्वस्त केंद्र सरकारचे ऐतिहासिक पाऊल - जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- कृषिप्रधान भारतात शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कटिबद्ध असणाऱ्या मोदी सरकारने आणखी एक क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात जीएसटी सुधारणांची घोषणा करून कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ दिले.

त्यानंतर झालेल्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत महत्त्वाचे व ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले असून, त्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना थेट फायदा होणार असून उत्पादन खर्चात कपात होईल आणि उत्पन्नवाढीच्या दिशेने वाटचाल होईल. कृषी क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या यंत्रसामग्रीवरील करदर मोठ्या प्रमाणात कमी करण्यात आला आहे. ट्रॅक्टर, हार्वेस्टर, गवत कापणी यंत्र, पिक कापणी मशीन, कंपोस्टिंग मशीन यांवरील जीएसटी दर १२ टक्के वरून ५ टक्के करण्यात आला आहे. तर ट्रॅक्टर पार्ट्सवरील करदर १८ टक्के वरून ५ टक्के करण्यात आला आहे. यामुळे दुरुस्ती व देखभाल खर्च कमी होऊन शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. याबरोबरच सिंचन व्यवस्थेच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा आहे.

हातपंप, स्प्रिंकलर, ड्रिप सिंचन प्रणाली यांवर ५ टक्के करदर लागू करण्यात आला आहे. पाणी बचत, कमी खर्च आणि शाश्वत शेतीसाठी हे मोठे पाऊल आहे. यासह खते व कीटकनाशकांवरही मोठी सवलत देण्यात आली असून रासायनिक खते, जैविक कीटकनाशके यांवरील करदर आता ५ टक्के करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चात उत्पादन करता येईल. याशिवाय बायोगॅस प्लांट, सौर ऊर्जा उपकरणे,हातगाड्या मध्ये देखील करदर कपात करण्यात आली आहे.

यामुळे शाश्वत व पर्यावरणपूरक साधनांचा वापर सुलभ होणार असून या सर्व सुधारणांमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नवाढीला चालना मिळणार असून भारतीय जनता पार्टी सदैव शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय हे शेतकरी-केंद्रित धोरणांचे स्पष्ट उदाहरण आहे, असे धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी सांगितले.

## जिल्ह्यात मारहाणीच्या दोन घटना: पोलिसात गुन्हा नोंद

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसासकडून समजलेली माहिती अशी की, रोहन बालाजी शितोळे, सुरज आप्पासाहेब पवार, संस्कार विठ्ठल शितोळे, अशोक नानासाहेब जाधव, सौदागर दत्तात्रय पवार, खंडु झुंबर मोटे, ओंकार गोरोबा शितोळ सर्व रा. वाडीबामणी ता. जि. धाराशिव यांनी दि.०१.०९.२०२५ रोजी झुबंर मोटे यांचे घरासमोर वाडीबामणी येथे फिर्यादी नामे-सदाशिव संतोष थिटे, वय २० वर्षे, रा.वाडीबामणी ता. जि. धाराशिव यांना नमुदांनी मागील भांडणाचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काठीने मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सदाशिव थिटे यांनी दि.०३.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे बेंबळी येथे ` गुन्हा नोंदवला आहे.

नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसांनी सांगितले की, नामदेव विठ्ठल ढाले, विलास विठ्ठल ढाले,सुकुमारबाई विठ्ठल ढाले, रा. किलज ता.तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०२.०९.२०२५ रोजी किलज येथे फिर्यादी नामे-आनंद मुकुंद गायकवाड, वय ४४ वर्षे, रा.किलज ता.तुळजापूर जि. धाराशिव यांना नमुद फिर्यादीचे भावाने प्लॉट घेतल्याचा राग मनात धरुन आमच्या घराकडे तोंड करुन का बसला या कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, कोयता व काठीने मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-आनंद गायकवाड यांनी दि.०३.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे नळदुर्ग येथे गुन्हा नोंदवला आहे.

## उद्योजक शरणाप्पा धुम्मा यांच्या मुलीचा वाढदिवस विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



मुरूम (सुधीर पंचगल्ले) जि. प. कन्या प्रशाला मुरूम शाळेत रोटरी क्लब मुरूम सिटी पदाधिकारी व मुरूम नगरीचे सुप्रसिद्ध उद्योजक रोटेरियन शरणाप्पा धुम्मा यांच्या मुलीचा वाढदिवस विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जि. प. कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक शेके हरी ग्यानबा हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ रोटेरियन डॉ. नितीन डागा, रोटेरियन कलाप्पा पाटील, रोटेरियन बदोले, रोटेरियन शिवानंद स्वामी इत्यादी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वाढदिवस कार्यक्रमाच्या प्रस्ताविक पर मनोगतात रोटेरियन डॉ. नितीन डागा यांनी रोटरीच्या कार्यप्रणालीची माहिती देऊन ते तळागाळातील शेतकरी, पर्यावरण, शिक्षण,आरोग्य यासाठी सतत प्रयत्न करते. त्यासाठी नियमित वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करून त्याचा लाभ गरजूना करून दिला जातो अशी माहिती दिली.

त्यानंतर कु.स्वरा शरणाप्पा धुम्मा वाढदिवस जि. प.कन्या प्रशाला व रोटरी सिटी क्लब मुरूम यांच्या संयुक्त विद्यमाने शाल, फेटा , पुष्पहार घालून व केक कापून साजरा करण्यात आला.

स्वराच्या वाढदिवसानिमित्त मनोगत व्यक्त करताना रोटे कल्लप्पा पाटील म्हणाले,शाळेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मुरूम रोटरी सिटी क्लब कटिबद्ध असल्याची ग्वाही

दिली तर रोटेरियन शरणाप्पा धुम्मा यांनी इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती पुस्तके देण्याच्या आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जाधव वंदना जयराम यांनी केले तर आभार श्रीमती कुलकर्णी रेणुका देवीदास यांनी मानले. वंदे मातरम गीताने कार्यक्रमाचे सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी गायकवाड, महादेव कुनाळे, डॉ.जाधव वंदना, सोनाली कलशेट्टी ,कुलकर्णी रेणुका, बिना पोतदार, सविता साळुंखे अलका गायकवाड,लक्ष्मीकांत महामुनी, नरवटे अश्विनी,साधू गायकवाड,परिचर तात्या जाधव या सर्वांचे सहकार्य लाभले.

## धाराशिव नगरपरिषद कर्मचारी गणेश मंडळातर्फे केले महाप्रसादाचे वाटप



धाराशिव : धाराशिव नगरपरिषद कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने नगरपरिषद कार्यालयात गणेश मूर्तीची स्थापना मोठ्या श्रद्धा व उत्साहात करण्यात आली. या पार्श्वभूमीवर दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजी (गुरुवार) नगरपरिषद प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथील सभागृहात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

गणपतीची आरती झाल्यानंतर गणेश मूर्तीसमोर महा प्रसाद (नैवेद्य) दाखवून सर्वांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. नागरिक व कर्मचारी वर्गासाठी भोजनाचे विशेष नियोजन यावेळी करण्यात आले होते.

या प्रसंगी नगरपरिषदेमधील श्रीमती जयश्री पाटील लेखापाल,श्रीमती वैशाली आवाड सुवर्ण जयंती विभाग प्रमुख,संतोष गायकवाड पाणीपुरवठा विभाग लिपिक,संगीता शिंदे प्रधानमंत्री आवास योजना विभाग प्रमुख, शामा अनभुले लिपिक,कर्मचारी उषा कोठावळे, मंगल निकम, राजाभाऊ पवार आदी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद कर्मचारी गणेश मंडळातर्फे गणपती स्थापना, आरती व महाप्रसाद कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या उपक्रमाचा नगरपरिषदेतील अधिकारी, कर्मचारी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी लाभ घेतला.

## क्राईम न्युज

### मोटारसायकलची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गतफिर्यादी नामे-दिपक अंकुश शिंदे, वय ३० वर्षे, रा.चुर्मापुरी ता. आंबड जि. जालना ह.मु. भुम ते वारदवाडी रोड नायरा पेट्रोल पंपाचे बाजूला जि. धाराशिव यांची अंदाजे ६०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.२९.०८.२०२५ रोजी . भुम ते वारदवाडी रोड नायरा पेट्रोल पंपाचे जवळून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दिपक शिंदे यांनी दि.०३.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पत्र्याच्या शेड मधून बोकडे चोरली

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-भास्कर धोंडीबा जाधव, वय ६० वर्षे, रा.लोणी ता. परंडा जि. धाराशिव यांचे शेत गट नं ४७७ मधील पत्र्याच्या शेड मधून बोकडे अंदाजे ७,००० किंमतीचे दि.०१.०९.२०२५ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-भास्कर जाधव यांनी दि.०३.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव येथून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-पृथ्वीराज विजय चव्हाण, वय २३ वर्षे, रा.किणी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ३०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.३१.०८.२०२५ रोजी चैत्राली क्लासेसच्या समोरच्या बाजूस सुधीर आण्णा यांच्या वाड्याच्या समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-पृथ्वीराज चव्हाण यांनी दि.०२.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पिक तुडवून नासधुस करुन पाईपलाईनचे केले नुकसान

नळदुर्ग(प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत सुरजसिंग जयरामसिंग, रणजितसिंग सर्व रा. येडोळा ता. तुळजापूर, अमोलसिंग स रा. सोलापूर ता. जि. सोलापूर यांनी दि.०२.०९.२०२५ रोजी फिर्यादीचे शेता शेजारी फिर्यादी सुधिरसिंग जयरामसिंग परिहार, वय ४४ वर्षे, रा.येडोळा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे शेतातील नमुद व्यक्तींनी सिताफळ, आंबा, चिंच जांभुळ, झेंडु वांगे टमाट्याचे पिक तुडवून नासधुस करुन पाईपलाईनचे नुकसान केले. शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुधिरसिंग परिहार यांनी दि.०३.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे नळदुर्ग येथे भा.न्या. सं.कलम ११८(१), ३५२, ३५१(२), १८९(२),१९१(२), १९० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भारत सक्षम बनला पाहिजे

भारत सर्व बाबतीत सक्षम बनला पाहिजे. सर्वात महत्वाचे म्हणजे युद्ध सामुग्री ही अत्याधुनिक असली पाहिजे. काही झाले तरी भारतीय जनतेनी आपला स्वस्वार्थ बाजूला सारला पाहिजे. भारताला महासत्तावादी देश बनवायाचे झाले तर आळस बाजूला सारला पाहिजे. इतर देश लहान असून आपल्यापुढे का आहेत याचा विचार केला पाहिजे. जपान, जर्मन आदि अनेक देश आपल्यापुढे आहेत. ते सक्षम बनले आहेत. शुन्यातून सर्व काही निर्माण केले आहे. चीनचे उदा. घेतले तर अनेक बाबी कळून येतील. जे मित्र नाहीत मात्र मित्राकडून चांगला गुण आपण अंगीकारला पाहिजे. चीन स्वतंत्र झाल्यावर पहिले पंतप्रधानाने देशात पाणी फिरवले. मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचे उत्पादन केले. अनेक लहानमोठे कॅनल निर्माण केले. एक बाब त्यांनी स्विकारली की, कोणतीही बाब वाय जाऊ द्यायची नाही. त्याचा पुर्नवापर करावयाचा. ज्याला भारतीय भाषेत म्हणावयाचे झाले तर वापरात नसलेल्या वस्तू फेकून देणे! असा विचार चीनी लोक करीत नाहीत. प्रत्येक वस्तूचा पुर्नवापर केला जातो. त्या वस्तू विकल्या जातात. त्यामुळे चीनी मालास चांगली किंमत मिळते. चीनी लोक एवढे मग्न असतात की, कोणी कोणाला बोलत नाहीत. आपआपले काम करीत असतात. चीन देशात नागरिक खरेदी करीत नाहीत म्हणून चीनी सरकार कामगारास सुट्टी देते व खरेदी करण्यासाठी बाहेर काढले जाते. असा प्रयत्न केला जातो. म्हणून चीनला जग काही प्रमाणात घाबरते. यामागील मुख्य कारण म्हणजे चीनी हे कष्ठाळू आहेत. श्रमास प्राधान्य देणारे आहे. त्यामुळे त्यांच्यातील चांगला गुण घेतला पाहिजे. भारत तसा सक्षम देश आहे. भारतीय मेहनती आहेत. जी काही मेहनत, कष्ठ केले जातात. ते अधिक प्रमाणात स्वार्थासाठी व उर्वरित देशासाठी! इतर देशात तसे नाही पहिल्यांदा देशासाठी कार्य केले जाते नंतर स्वस्वार्थासाठी! हा फरक लक्षात घेतला पाहिजे. जपान व जर्मनमध्ये ज्यावेळी संकट आले त्यावेळी जपान, जर्मन लोकांनी आठ तास देशासाठी काम केले व अधिक दोन तास देशासाठी मोफत काम केले. देश प्रगतीपथावर आणला. दोन तास अधिक काम करणे सोडून द्या! ज्या आठ तासात दोन-तीन तास वाया घालणारी मंडळी आपल्या भारतात सापडतील. बोटावर मोजण्याइतकीच मंडळी प्रामाणिक काम करणारी आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. आपला भारत देश प्रगतीपथावर कसा जाईल. कारण देश सर्वसंपन्न बनण्यासाठी पहिल्यांदा श्रम केले पाहिजेत. तेही देशासाठी केले पाहिजे ही बाब लक्षात घेतली पाहिजे. उगीच देशाचे नाव होत नाही. भारताचे पंतप्रधान किती तास काम करतात. एकदाही सुट्टी घेत नाहीत. विनाकारण वेळ खर्च करीत नाहीत. आकरा वर्षात एकही डाग लागला नाही. त्यांनी व त्यांच्या मंत्रीमंडळातील सदस्यावर एक तरी साधा भ्रष्टाचाराचा आरोप लागला नाही. असे स्वच्छ प्रशासन काम करीत आहेत. सर्व काही देश चालविणारा करेल असे नाही तर त्यांना जनतेनी साथ दिली पाहिजे. तरच देश प्रगतीपथावर जाईल. त्यामुळे इतर देश कष्ठ व मेहतीच्या जोरावर पुढे गेले आहेत. मुळात भारतीय हे कोणतेही संकट आले तरी घाबरत नाहीत. उन्ह असो किंवा उणे तापमान असो ते देशाचे संरक्षण करीत असतात. असे जरी असेल तरी देशातील जनता देशप्रेमी असली पाहिजे. आपल्या देशात काय होत आहे. जो नदीरूपात नाव चालविणाराच समजदार दिसून येत नाही. तोच जर भ्रष्ट असेल तर यंत्रणा भ्रष्ट होण्यात वेळ लागणार नाही. एखादा कार्यालयात प्रमुख अधिकारी वेळेवर येत असेल तर बाकीचा स्टॉप हा वेळेपुर्वी कामावर हजर राहातो. वरिष्ठ अधिकारी आपणहोवुन कार्यालयातील दिवस दिवे बंद व पंखे बंद करणारा असेल तर बाकीचे कर्मचारी राष्ट्रीय संपत्तीचे बचत करण्यात शिकतील. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्याने चांगले वागले पाहिजेत. त्यांच्यात भरपूर प्रमाणात राष्ट्रीय विचार रुजले पाहिजेत. आज तसे पाहिले तर अनेकांना बऱ्या प्रमाणात कामाचा मोबादला मिळतो. त्या बदल्यात तेवढ्या प्रमाणात काम करतो का? किंवा प्रामाणिक परतफेड करतो का? याचा विचार करीत नाहीत. त्यामुळे भारत म्हणजे आपण सर्वजन महासत्ताधिश बनण्यासाठी प्रामाणिक कष्ठ केले पाहिजेत. केवळ जपान, जर्मन, अमेरिका किंवा चीनचे नाव घेत असतो. यामागील कारणाचा विचार केला पाहिजे. मुळात भारतीयात चुकीची शिक्षण पद्धती आवलंबली गेली. चुकीचा मार्ग अनुकरण केला. त्याच प्रमाणे गुरुकुलीय पद्धत बंद करून लार्ड मेकाले याने विदेशपद्धती लागू केली त्याचा हा मोठा परिणाम आहे. मुळात आपल्या देशात आपली संस्कृती विसल्याचा परिणाम आहे. प्रभु रामचंद्र व योगीराज श्रीकृष्ण यांचे शिक्षण गुरुकुलात झाले हे विसरता येत नाही. मुळात ज्यावेळी स्वामी श्रद्धानंदजी यांच्या गुरूकुलात ब्रिटीशांनी चौकशी केली त्यावेळी त्यांना बॉम्ब सापडला नाही त्यावेळी स्वामी श्रद्धानंदजी यांनी घंटी वाजवली व गुरुकुलातील विद्यार्थी रांगेत उभा राहीले त्यावेळी ब्रिटीश अधिकाऱ्यास स्वामीजी म्हणाले हा गुरुकुलातील एक-एक विद्यार्थी हा भारतीय बॉम्ब आहे. असे शिक्षण व विद्यार्थी पुर्वीच्याकाळी तयार होत होते. तसे परत होणे अपेक्षित आहे, तरच भारत लवकरच महासत्ताधिश बनेल. आज अमेरिका हा विनाकारण आर्थिक त्रास देत आहे. त्रास देण्यापुर्वी घाबरला पाहिजे. तरच भारतीयांची जगात शान व मान उंचविल्याशिवाय राहाणार नाही. जग भारतीयांना घाबरले पाहिजे. असे काम भारतीयांनी केले पाहिजे. किमान करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुळात आपल्यात क्षमता आहे, कौशल्य आहे. अशा स्थितीत केवळ प्रयत्नाची गरज आहे. भारताची सध्याची वाटचाल महासत्ताधिशाकडे आहे. यात दुमत नाही. त्याच प्रमाणे भारतीय स्वसंरक्षणासाठी युद्धात सक्षम असले पाहिजे. युद्धायंत्रणेच्या बाबती अग्रेसर असले पाहिजे. भारतीय बनावटीचे युद्धसामुग्री निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अधिक तरतुद यासाठी असल्या पाहिजेत. भारत हा लवकरच अमेरिकेपेक्षा महासत्ताधिश बनला पाहिजे. यासाठी भारतीयांनी तसे प्रयत्न करण्याची गरज आहे.

# श्री गणेश विसर्जन निमित्त शनिवारी लातूर शहरातील वाहतूक मार्गात बदल

**लातूर/प्रतिनिधी :** लातुर शहरात दिनांक ०६/०९/२०२५ रोजी श्री चे विसर्जन असल्याने शहरात विविध मंडळातर्फे वाजत-गाजत श्री ची मिरवणुक काढण्यात येते. त्यामुळे जनतेच्या सोयीच्या व सुरक्षीततेच्या दृष्टीने लातूर शहरातील खालील मार्गावर वाहतुक बंद करणे व पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे.

लोकांच्या दैनंदीन कामकाजानिमीत्त व दळणवळणानिमीत्त त्यांना विविक्षीत ठिकाणी पोहचणे निकडीचे असते, सदरच्या अडचणी लक्षात घेता सदर भागातुन वाहतुक बंद करणे व वाहतुक वळविणे आवश्यक आहे. तरी दिनांक ०६/०९/२०२५ रोजी सदर भागातील वाहतुक बंद करुन विविध भागात वळविणे आवश्यक आहे.

दिनांक ०६/०९/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते रात्री २३.०० वाजेपर्यंत वाहतुकीस बंद असणारे मार्ग

अ) मिरवणुका या पी.व्ही.आर चौक ते दयानंद गेट, छत्रपती शिवाजी महाराज चौक,अशोक हॉटेल, गांधी चौक, हनुमान चौक, गंजगोलाई तसेच काही मिरवणुका छत्रपती शिवाजी महाराज चौक, आदर्श कॉलनी, राजीव गांधी चौक ते बांधकाम भवन व काही मिरवणूका विवेकानंद चौक ते शाहु चौक, गंजगोलाई, सुभाष चौक, दयाराम रोडने खडक हनुमान, पटेल चौक, सिद्धेश्वर चौक या मार्गे सिद्धेश्वर मंदीर येथे विसर्जन होणार आहे. त्यामुळे दिनांक ०६/०९/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते रात्री २३.०० वाजे पर्यंत सदरचा रोड हा सर्व प्रकारच्या वाहनांना (मोटार सायकल, थ्री व्हीलर, एस.टी.बसेस, ट्रक,टॅम्पो,टॅक्सी,ट्रॅव्हल्स, मिनीडोअर इ.) वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे.

दिनांक ०६/०९/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते रात्री २३.०० वाजेपर्यंत पर्यायी मार्ग:

ब) तरी जनतेने श्री विसर्जन काळात खालील पर्यायी मार्गाचा अवलंब करावा.

१) पी.व्ही.आर चौकातुन शिवाजी चौक व शहरात येणारे एस.टी.बसेस पी.व्ही. आर.चौकातुन रिंगरोडने नवीन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापुर नाका येथील बसस्टॅन्डचा वापर करतील.बाकी सर्व वाहने जुना रेल्वे लाईनच्या पॅरलल रोडचा वापर करतील.

२) औसा रोडने शहरात येणा-या एस.टी.बसेस या वाडा हॉटेल येथून रिंग रोडने, खाडगाव टी पॉईंट, पी.व्ही.आर चौक, रेल्वे स्टेशन चौक, नविन रेणापूर नाका मार्गे जुना रेणापूर नाका येथील बसस्थानक क्र २ चा वापर करतील. तसेच चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने जुना औसा रोड एल.आय.सी.कॉलनी, नाईक चौक,सुतमील रोड या मार्गाचा वापर करतील.

३) रेणापुर रोडने शहरात येणाया एस.टी.बसेस जुना रेणापुर नाका येथील बसस्थानकाचाच वापर करतील.रेणापुर रोडने येणारी चार चाकी,तीन चाकी व दोन चाकी वाहने ही जुना रेणापुर नाका बालाजी मंदीर व खोरी गल्ली या मार्गाचा वापर करतील.

४) गंजगोलाई-सुभाष चौक-दयाराम रोड मार्गे-खडक हनुमान-सिध्देश्वर मंदिर या मिरवणुक मार्गावर सर्व वाहनास सदरचा रोड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

५) नांदेड रोडने शहरात येणा-या एस.टी.बसेस या गरुड चौक, सिद्धेश्वर चौक,नविन रेणापुर नाका मार्गे जुना रेणापुर नाका येथिल बसस्थानकाचा वापर करतील.

६) तसेच शहरातील वाहतुकीसाठी जनतेस ) राजस्थान विद्यालय ते दयानंद गेट या पॅरलल रोडचा ) गांधी चौक ते बसवेश्वर महाविद्यालय - रमा चित्रपटगृह खोरी गल्ली शिवनेरी लॉज या मार्गाचाच अवलंब करावा. जुना रेणापुर नाका बसस्थानक येथे येणा-या व जाणा-या सर्व बसेस परत त्याच मार्गे रिंग रोडने जातील.

तरी सर्व नागरीकांनी उक्त आदेशाप्रमाणे वाहतुकीसाठी बंद असल्याचे घोषित करण्यात आलेल्या मार्गाचा वापर न करता पर्यायी मार्गाचा वापर करुन महानगरपालिका व पोलिस प्रशासनास सहकार्य करावे.

# राज्य महोत्सव : गणेशोत्सव

गणेशोत्सव हा महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात अतिशय उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा महत्त्वपूर्ण सण आहे. श्री गणेश हे विघ्नहर्ता, बुद्धीचे दैवत व मंगलकार्याचे अधिपती मानले जातात. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यचळवळीच्या काळात या उत्सवाला सार्वजनिक रूप दिले. त्यामागचा उद्देश समाजातील एकता वाढवणे व स्वराज्याच्या लढ्यासाठी लोकांना एकत्र आणणे हा होता. त्यामुळे गणेशोत्सवाला सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकही महत्त्व प्राप्त झाले.

गणेशोत्सव हा फक्त धार्मिक उत्सव नसून तो समाजाला एकत्र बांधणारा, संस्कृती जपणारा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उत्सव आहे. गणेशोत्सवाच्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पर्यटन, त्यावर आधारित विविध उद्योग व व्यवसाय यांना मोठ्या प्रमाणात चालना मिळते. राज्याची परंपरा व संस्कृती जपली जाते. ही परंपरा आणि संस्कृती अधिक वृद्धिंगत व्हावी यासाठी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी आपला गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याची १८ जुलै २०२५ रोजी विधीमंडळात घोषणा केली. त्यानुसार शासनाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून जाहीर केले.

गणेशोत्सवाला शासनाकडून राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आल्यानंतर या महोत्सवांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रम आणि इतर कार्यक्रम समन्वयनासाठी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई या कार्यालयाकडे जबाबदारी देण्यात आली.



**घरगुती तसेच सार्वजनिक श्री गणेश मंडळे**

या गणेशोत्सव काळात घरगुती आणि सार्वजनिक गणेश मंडळांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला. यात राज्यस्तरीय प्रथम विजेत्याला रूपये ७.५० लाख तर जिल्हास्तरावरीय प्रथम विजेत्यास रूपये ५० हजार आणि तालुकास्तरीय विजेत्यांना रूपये २५ हजार व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आजमितीस महाराष्ट्रभरातील ४०४ पेक्षा जास्त मंडळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. घरोघरीच्या श्री गणेशांचे दर्शन व सार्वजनिक मंडळांच्या श्री गणेशांचे दर्शन घरबसल्या घेणे शक्य व्हावे यासाठी घरगुती व सार्वजनिक श्री गणेशांचे छायाचित्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या https:// ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे मोठ्या संख्येने भाविक आपल्या श्री गणेशांची छायाचित्रे सर्व गणेशभक्तांच्या दर्शनासाठी अपलोड करत आहेत. या पोर्टलद्वारे आजवर २०० हून अधिक जणांनी आपल्या घरच्या व ७० हून अधिक सार्वजनिक मंडळांनी फोटो अपलोड केले आहेत.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध गणपती मंदिरे व प्रसिद्ध सार्वजनिक मंडळाच्या गणपतींचे थेट दर्शन जगभरातील गणेशभक्तांना एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे, याकरिता सुरू करण्यात आलेल्या पोर्टलला देखील गणेशभक्तांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत आहे. या पोर्टलमुळे प्रामुख्याने मुंबईचा लालबागचा राजा, मुंबईचा राजा, खेतवाडीचा गणराज, पुण्याचा दगडूशेठ हलवाई, श्री सिद्धिविनायक मंदिरातील सिद्धिविनायकाचे दर्शन, अष्टविनायकांचे व टिटवाळ्याच्या गणपतीचे दर्शन एकाच क्लिकवर उपलब्ध झाले आहे. या दोन्ही पोर्टलमुळे जगभरातील गणेशभक्तांना घरबसल्या विविध जिल्ह्यातील व शहरातील गणपतींचे अतिशय सुलभ दर्शन होत आहे.

**भजनी मंडळ**

गणेशोत्सव काळात भजनी मंडळांचा मोठा सहभाग असतो. याच अनुषंगाने राज्यातील नोंदणीकृत तसेच भजन क्षेत्रातील शिखर संस्थांना रूपये ५ कोटी अनुदान देण्याबाबतची तरतूद करण्यात आली. राज्यात १८०० भजनी मंडळे नोंदणीकृत असून त्यांना प्रत्येकी २५ हजार रूपये अनुदान म्हणून देण्यात येणार आहे.

**रील स्पर्धा**

गणेशोत्सवाला रील स्पर्धेच्या माध्यमातून देश-विदेशात नवे आयाम मिळावे, यासाठी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने रील स्पर्धे चे आयोजन देखील करण्यात आलेले आहे. ही स्पर्धा राज्यातील महसूल विभागीय स्तर, राज्यस्तर आणि महाराष्ट्राबाहेर व भारताबाहेरील खुला गट अशा तीन गटात होत आहे. रील तयार करण्यासाठी पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या थीम मध्यवर्ती ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील तयार करावयाची आहे.

महसूल विभागीय स्तरावरील विजेत्या स्पर्धकाला प्रथम पारितोषिक २५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार, तृतीय पारितोषिक १० हजार, उतेजनार्थ विजेत्यास ५ हजार अशा स्वरुपात पारितोषिक दिले जाईल. या स्पर्धेतील राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १ लाख रुपये, द्वितीय पारितोषिक ७५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक ५० हजार रुपये, उतेजनार्थ पारितोषिक २५ हजार रुपये देण्यात येईल. तर महाराष्ट्र व भारताबाहेरील विजेत्या गटातील स्पर्धकाला प्रथम क्रमांकाचे १ लाख रुपये बक्षीस, द्वितीय क्रमांकासाठी ७५ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये, उतेजनार्थ म्हणून २५ हजार रुपये देण्यात येणार आहे.

**विशेष उपक्रम**

गणेशोत्सवाच्या १० दिवसाच्या काळात राज्याच्या प्रत्येक विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत ''ऑपरेशन सिंदूर''द्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना राबविणाऱ्या व्यक्तींचाही गौरव करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनेस्को मानांकन मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विविध विषय घेऊनही हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. श्री गणेशाला वंदन करण्यासाठी पु.ल.देशपांडे अकादमीकडून 'आला रे आला गणराया आला' या विशेष गीताचीही निर्मिती करण्यात आली.

**जागतिक व्यासपीठ**

गणेशोत्सवानिमित्त कलाकारांना महाराष्ट्र राज्याबाहेर देखील व्यासपीठ मिळणार आहे. याचाच एक भाग म्हणून २७ ते २९ ऑगस्ट, २०२५ दरम्यान वन संशोधन केंद्र डेहराडून या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आला. नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे १ सप्टेंबर २०२५ सांस्कृतिक कार्यक्रम झाला तर ३ सप्टेंबर २०२५ रोजी के एम गिरी सभागृह, बेळगाव या सीमावर्ती भागात गणेशोत्सवाचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले. सर सयाजीराव नगर वडोदरा गुजरात या ठिकाणी म्हणजेच ४ सप्टेंबर २०२५ रोजी भाग्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ५ सप्टेंबर २०२५ रोजी गोवा राज्यात मराठी बांधवांसाठी भव्य संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

गणेशोत्सवाला ''राज्य महोत्सव'' दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात एक भरीव वाढ झाली आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार, हे नक्की

**– संजय डी.ओरके,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

# आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन : नि:स्वार्थ सेवेतून उमलणारे मानवतेचे दर्शन

समाजात प्रत्येक जण सारख्या संधींनी, सारख्या साधनसंपत्तीने, सारख्या सुखसोयींनी जन्माला येत नाही. कोणाकडे भौतिक संपत्तीची रेलचेल असते तर कोणाला दोन वेळचे जेवणही परवडत नाही. कोणाला शिक्षणाच्या संधी सहज उपलब्ध होतात तर कोणाला दारिद्र्यामुळे शाळेच्या दारातही पाऊल ठेवता येत नाही. कोणाकडे आधुनिक वैद्यकीय सेवा असतात तर कोण जीव वाचवण्यासाठी औषधांच्या अभावाने तडफडत राहतो. या असमानतेच्या जगात माणसाला माणसाचा आधार आवश्यक ठरतो. मानवाच्या इतिहासात जर काही मूल्ये शाश्वत ठरली असतील तर त्यामध्ये करुणा, सहानुभूती, मदतीची वृत्ती आणि नि:स्वार्थ सेवा या मूल्यांचा नक्कीच समावेश होतो. माणूस हा सामाजिक प्राणी आहे, ही संकल्पना केवळ समाजशास्त्रापर्यंतच मर्यादित नाही तर ती मानवी अस्तित्वाची मूलभूत अट आहे. माणूस एकटा जीवन जगू शकत नाही. त्याच्या जगण्याला अर्थ प्राप्त होतो तो एकमेकांच्या सहकार्याने, आधाराने, प्रेमाने आणि सेवाभावाने. धर्मादाय कार्य हीच त्या सहजीवन संस्कृतीची मूळ प्रेरणा आहे. याच भावनेच्या स्मरणार्थ दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन' साजरा केला जातो.

दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी साजरा केला जात असलेला हा 'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिवस मदर तेरेसा यांच्या स्मृतिदिनाशी जोडलेला आहे. कलकत्त्याच्या गल्लीबोळांत निराधार, भुकेले, रोगग्रस्त, निराश्रित यांना त्यांनी उचलून घेतले. त्यांनी त्यांना केवळ औषधे वा अन्न दिले नाही, तर मातेच्या मायेने जिवाला आधार दिला. त्यांची सेवा नि:स्वार्थतेची खरी परिभाषा होती. म्हणूनच संयुक्त राष्ट्रसंघाने १७ डिसेंबर २०१२ मध्ये ५ सप्टेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन' म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली. या निर्णयामुळे धर्मादाय कार्याचे महत्त्व जागतिक स्तरावर अधोरेखित झाले. भारतीय संस्कृतीत धर्मादाय हा जीवनाचा अविभाज्य घटक राहिला आहे. आपल्या संस्कृतीत 'अन्नदानं परमं दानं' असे म्हटले आहे. धर्मादाय कार्य ही मानवी संस्कृतीतील नवी संकल्पना नाही. भारतीय संस्कृतीत तर ती अनादिकालापासून रुजलेली आहे. 'दान' हे जीवनमूल्य आपल्या परंपरेत विशेष महत्त्वाचे मानले गेले. अन्नदान, जलदान, विद्यादान, गोदान, भूमीदान अशा अनेक प्रकारांनी दानधर्म आपल्या समाजजीवनाचा पाया ठरला आहे. प्राचीन काळात राजा असो वा प्रजा, सर्वांनी आपल्याकडील थोडेफार साधनसंपत्ती समाजोपयोगी कार्यासाठी खर्च करणे हे आपले कर्तव्य मानले. त्यामुळे धर्मादाय कार्य हा केवळ धार्मिक कृत्यांचा भाग नसून, तो मानवी जीवनशैलीचा अविभाज्य घटक बनला आहे. संतपरंपरेतील संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ यांसारख्या संतांनी परोपकाराचे महत्त्व सांगितलेले असून या तत्त्वाने आपले समाजजीवन समृद्ध झाले.

आजच्या आधुनिक जगात धर्मादाय कार्याची व्याप्ती आणखी विस्तृत झाली असून धर्मादाय कार्याने नवे आयाम घेतले आहेत. पूर्वीचे दान हे प्रामुख्याने वैयक्तिक पातळीवर होत असे; आता ते संस्थात्मक स्वरूपात विस्तारले आहे. हे कार्य केवळ धार्मिक वा पारंपरिक कृत्यापुरते मर्यादित न राहता शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, बालकल्याण, कौशल्यविकास, आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांत सक्रिय झाले आहे. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, अनाथ मुलांना निवारा, ग्रामीण भागात आरोग्यशिबिरे, अपंगांसाठी साधने, महिलांना स्वावलंबनासाठी मदत अशा असंख्य स्वरूपांत धर्मादाय कार्य पुढे येत आहे. स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संघटना, सामाजिक चळवळी, धार्मिक ट्रस्ट, तसेच औद्योगिक घराण्यांनी उभारलेले 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' उपक्रम या सगळ्यांनी धर्मादाय कार्याला नवीन दिशा दिली आहे. धर्मादाय म्हणजे केवळ पैशाची देणगी नव्हे, तर वेळ दान करणे, ज्ञान वाटणे, रक्तदान करणे, अवयवदान करणे, पर्यावरणासाठी झाडे लावणे, एखाद्या दु:खी व्यक्तीचे बोलणे शांतपणे ऐकणे हीसुद्धा धर्मादायाचीच रूपे आहेत. कधी कधी भावनिक आधार देणे हे भौतिक मदतीपेक्षा जास्त मौल्यवान ठरते. त्यामुळे धर्मादायाचा खरा अर्थ म्हणजे आपल्याकडील कोणतेही साधन नि:स्वार्थ भावनेने इतरांच्या हितासाठी वापरणे होय. जगभरात धर्मादाय कार्याने समाजाला दिलासा दिला आहे. आफ्रिकेत उपासमारीविरुद्ध लढणाऱ्या संस्था, युद्धग्रस्तांना मदत करणारे स्वयंसेवक, नैसर्गिक आपत्तींमध्ये धावून जाणारे कार्यकर्ते हे सर्व धर्मादाय वृत्तीचे उदाहरण आहेत. भारतातही पूर, दुष्काळ, भूकंप, चक्रीवादळ यांसारख्या आपत्तींच्या वेळी धर्मादाय संस्था पीडितांना मदत करतात. विशेषतः कोरोना महामारीच्या काळात धर्मादाय कार्याची खरी ताकद दिसली. रुग्णांसाठी ऑक्सिजन, औषधे, अन्नधान्य पुरवणे, अंत्यसंस्कार व्यवस्थेत मदत करणे या सेवेमुळे लाखो जीव वाचले. धर्मादाय कार्याचे खरे सामर्थ्य समाजात दीर्घकालीन बदल घडवण्यात आहे. एका भुकेल्याला अन्न देणे आवश्यक आहेच; पण त्याला शिक्षण, रोजगाराची संधी देणे अधिक परिणामकारक ठरते. धर्मादायाने व्यक्तींना आत्मनिर्भर बनवले पाहिजे. दारिद्र्य, निरक्षरता, बेरोजगारी, विषमता कमी करण्यासाठी धर्मादाय कार्याने दीर्घकालीन उपाययोजना राबवणे गरजेचे आहे.

आजची तरुणाई या कार्यात सक्रिय झाली आहे. 'रॉबिनहूड आर्मी'सारखे गट उरलेले अन्न गोळा करून भुकेल्यांपर्यंत पोहोचवतात. 'युथ फॉर सेवा'सारख्या संस्था ग्रामीण भागात आरोग्य आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देतात. महाविद्यालयीन विद्यार्थी 'राष्ट्रीय सेवा योजना' आणि राष्ट्रीय छात्र सेना' द्वारे गावोगावी जाऊन शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवतात. 'सोशल मीडियाच्या मदतीने निधी संकलन, रक्तदान मोहिमा, शैक्षणिक साधनांची उभारणी या उपक्रमांमध्ये युवकांची मोठ्या प्रमाणात भागीदारी दिसत असून हीच नवी पिढी धर्मादाय कार्याचा चेहरा बदलत आहे. तथापि, धर्मादाय क्षेत्रात काही आव्हानेही आहेत. काही संस्था निधीचा अपव्यय करतात, पारदर्शकता नसते, बनावट उपक्रम राबवले जातात. या सर्वांमुळे धर्मादाय कार्याची विश्वासार्हता डळमळते. म्हणूनच या कार्यात प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि पारदर्शकता आवश्यक आहे. धर्मादाय कार्य हे प्रसिद्धीच्या हव्यासापोटी नसून नि:स्वार्थतेच्या भावनेतूनच व्हायला हवे. धर्मादाय कार्याचा लाभ फक्त गरजूंनाच नाही, तर दान करणाऱ्यालाही होतो. दानातून मिळणारा अंत:करणातील आनंद, समाधान आणि शांतता हे पैशाने विकत घेता येत नाही. म्हणूनच धर्मादाय हा केवळ सामाजिक कर्तव्य नसून जीवन जगण्याची एक अर्थपूर्ण पद्धत आहे.

'आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन' आपल्याला आठवण करून देतो की आपण या समाजाचे देणे लागतो आणि ते परत करण्याचा एक मार्ग म्हणजे धर्मादाय कार्य करणे होय. मोठ्या देणग्यांची आवश्यकता नाही; लहान कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवतात. वाढदिवशी रक्तदान करणे, सण-समारंभामध्ये गरीबांना अन्नदान करणे, वाचनालयासाठी पुस्तके देणे, एखाद्या अनाथ मुलाच्या शिक्षणाचा खर्च उचलणे अशा छोट्या छोट्या कृतींचे मूल्य अनमोल आहे. मदर तेरेसा म्हणत असत की, 'आपण जे करतो ते समुद्रातील एक थेंब आहे; पण त्या थेंबाशिवाय समुद्र अपूर्ण आहे.' आपण प्रत्येकाने आपापला तो थेंब दिला तर समाजात करुणा, समानता आणि माणुसकीचे खरे साम्राज्य निर्माण होईल. नि:स्वार्थ सेवेतून उमलणारे हे मानवतेचे दर्शनच जगाचे खरे वैभव आहे, आणि त्याच दर्शनाचा गौरव करण्यासाठी आंतरराष्ट्रीय धर्मादाय दिन आपल्याला अंतर्मुख करतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
ईमेल-bagate.rajendra4@gmail.com

# घरातच बनवा आपल्या मुलांसाठी कॅल्शियम पावडर; हजारो रुपये वाचतील, मालही अस्सल

वाढत्या मुलांना कॅल्शियमच्या कमतरतेचा त्रास होत असल्याचे अनेकदा दिसून येते. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे लहान मुलांची हाडे कमकुवत होतात त्यामुळे त्यांना चालण्यास त्रास होतो किंवा ते अत्यंत कमकुवत होतात. कॅल्शियम हे एक खनिज आहे जे मुलांच्या सामान्य वाढ आणि विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. कॅल्शियम हाडांची ताकद, मानसिक कार्यक्षमता, रोगप्रतिकारक शक्तीचे कार्य आणि स्नायूंच्या आकुंचनासाठी देखील आवश्यक आहे. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे, मुलांना हात-पायांमध्ये मुंग्या येणे, हाडे फ्रॅक्चर होण्याचा धोका वाढतो आणि दातांचा बाहेरील थर खराब होतो. डॉ. निताशा गुप्ता यांनी सोशल मीडियावर घरगुती प्रोटीन पावडरची रेसिपी शेअर केली आहे. जी ६ वर्षे ते १५ वर्षे वयोगटातील मुलांसाठी कॅल्शियम पावडर म्हणून उपयुक्त ठरत आहे. ही पावडर कशी बनवायची याची रेसिपी सांगितली असून यामुळे मुलांमध्ये कधीही कॅल्शियमची कम तरता होणार नाही. जाणून घ्या ही पावडर कशी बनवता येते.

मुलांना कॅल्शियमची कमतरता भासू नये म्हणून ही पावडर बनवा. डॉक्टर निताशाच्या म्हणण्यानुसार पावडर बनवण्याची सामुग्री



आणि रेसिपी गॅसवर भांड ठेवा आणि त्यात अर्धा चमचा तूप घाला. आता त्यात २५० ग्रॅम मखना टाका आणि हलका तपकिरी होईपर्यंत शिजवा आणि बाहेर काढा. यानंतर पुन्हा थोडे तूप घालून २५ ग्रॅम बदाम घालून तळून घ्या आणि बाहेर काढा.

पुढच्या टप्प्यात ५० ग्रॅम पोहे घेऊन तुपात भाजून घ्या.

हे तिन्ही पदार्थ एकऊ करून मिश्रण थंड करा.

आता तिन्ही बारीक करून बारीक पावडर बनवा. ही पावडर तुम्ही एक महिना ठेवू शकता.

बाहेर फिरायला जाताना कोमट दुधात एक चमचा पावडर मिसळून मुलांना देऊ शकता.

प्रोटीन पावडरची रेसिपी

अशी बनवा प्रोटीन पावडर

या पावडरने लहान मुलांनाही खीर किंवा प्रोटीन ज्यूस बनवता येते.

प्रोटीन बनवण्यासाठी एका भांड्यात चतुर्थांश ग्लास दूध घ्या आणि त्यात २ चमचे तयार पावडर टाका

डॉ. निताशा यांच्या म्हणण्यानुसार, ही पावडर ६ वर्षे ते १५ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या मुलांना खाऊ घालू शकते. यामुळे शरीरात कॅल्शियमची कमतरता भासत नाही आणि मुले तंदुरुस्त आणि निरोगी राहतात.

मखानाचा फायदा

मखानामुळे मुलांच्या शरीरात ताकद वाढेल. ह्दयाचे आरोग्य राहिल उत्तम. मुलांच्या शरीरात ताकद, ऊर्जा आणि उत्साह वाढवण्यासाठी होतो फायदा

तूपाचा फायदा

तूपामुळे शरीराला ताकद मिळते. तसेच सांध्यांमध्ये योग्यप्रकारे घर्षण होण्याकरिता तूपाचा फायदा होतो. तुपामुळे बाळाला शौचाला चांगली होते. तसेच ताकद वाढते.

# मराठवाड्यातले अतिवृष्टीग्रस्त मदतीच्या प्रतीक्षेत

मराठवाड्यातील नांदेड ,लातूर, बीड, परभणी या जिल्ह्यात गेल्या आठवड्यात अतिवृष्टी झाली. मराठवाड्यातील १३० मंडळात येणाऱ्या जवळपास २ हजार५५० गावांना या अतिवृष्टीचा फटका बसला. अतिवृष्टीमुळे पिकांची तर नासाडी झालीच आहे पण शहरी भागातही मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. या अतिवृष्टीची सरकार दरबारी नोंद आहे. पालकमंत्र्याकडून त्याची पाहणीही झाली आहे. परंतु अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना मदतीसाठी अजून वाट पहावी लागत आहे.

मराठवाड्यातील नांदेड, लातूर, बीड, परभणी या जिल्ह्यांत मागच्या आठवड्यात अतिवृष्टी झाली. मराठवाड्यातील १३० मंडळांत येणाऱ्या जवळपास २५५० गावांना या अतिवृष्टीचा फटका बसला. वार्षिक सरासरी ६७९ मि.मी.च्या तुलनेत विभागात ५७३ मि. मी. म्हणजेच ८४% पाऊस झाल्याची नोंद आहे. मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टरवरील पिकांची पूर्ण नासाडी झाली. एवढेच नव्हे तर शहरी भागात असलेल्या घरांमध्ये गुडघाभर पाणी शिरले. अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीग्रस्त नागरिक, शेतकरी व व्यापारी राज्य शासनाकडून मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. मराठवाड्यात प्रशासनाकडून पंचनामे सुरू झाले आहेत. पालकमंत्र्यांकडूनही पूरग्रस्त भागाची पाहणी झालेली आहे. शासनाने लवकरात लवकर अतिवृष्टीग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

मराठवाड्यात मुसळधार पावसाचा कहर कायम असून नांदेड जिल्ह्यात गुरुवारी एकाच दिवशी तब्बल १३२.७ मिलिमीटर पाऊस झाला. याच जिल्ह्यातील ७३ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली. मागील आठवड्यात चार दिवस मराठवाड्याला पावसाने झोडपले. विभागात शुक्रवारी सकाळी साडेआठपर्यंत ६० मिलिमीटर पाऊस झाला. नांदेड आणि लातूर जिल्ह्यात पावसाची तीव्रता अधिक होती. नांदेड जिल्ह्यात एका दिवसात १३२.७ मिमी पाऊस झाला तर लातूरला ९१.८, छत्रपती संभाजीनगर २९.९, जालना १३.१, बीड ४८.४, धाराशिव १६.१, परभणी ३८.४ आणि नांदेड जिल्ह्यात गुरुवारी तब्बल १३२.७ मिलिमीटर पाऊस झाला. हिंगोलीत १९.९ असा जिल्हानिहाय पाऊस झाला. पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. नांदेड आणि लातूर जिल्ह्यात अनेक पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती. आजही बंधारे, तलाव पूर्ण भरून ओसंडून वाहत आहेत. या दोन जिल्ह्यांत पावसामुळे खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. विभागात १३० महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. त्यात नांदेड जिल्ह्यातील ७३ मंडळांचा समावेश आहे. कंधार आणि माळाकोळी महसूल मंडळात २८४ मिमी पाऊस झाला. विष्णुपुरी (२६७), कुरुळा (२२९), बारूळ, जायकवाडी धरणे भरली. जोरदार पावसामुळे मोठ्या धरणात पाण्याची आवक वाढली. जायकवाडी, सिद्धेश्वर, मानार आणि सिना कोळेगाव ही धरणे पूर्ण भरली आहेत. निम्न दुधना ७५, येलदरी ९६.३१, माजलगाव ८२.७९, मांजरा ९९.२०, पैनगंगा ९६.१५, निम्न तेरणा ९६.९२, विष्णुपुरी ५८.५५ असा धरणनिहाय पाणीसाठा आहे. विभागातील मोठ्या ११ धरणात ९३.७२ टक्के पाणीसाठा झाला आहे, अशी माहिती जलसंपदा विभागाने दिली. पेठवडज (२७५), डिग्रस (२२९) आणि कापसी (२६७) या मंडळात विक्रमी पाऊस झाला. मागील आठवड्यात संपूर्ण मराठवाड्यात पावसामुळे जनजीवन ठप्प झाले होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चार मंडळे, बीड जिल्ह्यातील १६ आणि लातूर



जिल्ह्यातील ३६ मंडळांत अतिवृष्टी झाली. लाखो हेक्टरवरील पिके खरडून गेली आहेत. शेतकऱ्यांच्या हातात काहीही पडणार नाही, हे सिद्ध झाले आहे.

मराठवाड्यात पुन्हा ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने लष्कराच्या तुकडीला मदतीला बोलवावे लागले. पावसाने अक्षरशः रौद्ररूप धारण केले होते. हा पाऊस ढगफुटीलाही लाजवेल एवढा मोठा होता. या पावसाबरोबरच नांदेड व लातूर जिल्ह्यात तेलंगणा, कर्नाटक सीमेवर असलेल्या गावांना बॅकवॉटरचा फटका बसला. मराठवाड्यात यंदाच्या अतिवृष्टीत नुकसानीचा अंदाज लावणे देखील कठीण होऊन बसले. नांदेड जिल्ह्यातील बिलोली, नरसी, नायगाव, मुखेड, कंधार, देगलूर, उमरी, मुदखेड, धर्माबाद, माहूर, किनवट, भोकर, अर्धापूर तालुक्यात मुसळधार पाऊस पडला. हा पावसाचा जोर या दोन्ही राज्यांच्या सीमेवर असलेल्या लातूर व नांदेड जिल्ह्यातही वाढला. त्यामुळे या भागातील जनजीवन विस्कळीत झाले. गावातील नदीकाठच्या गावात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले. त्यामुळे तेथील लोकांना सुरक्षित जागी स्थलांतरित करण्यात आले. नांदेड, हिंगोली व परभणीतही मोठा पाऊस झाल्याने या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

हैदराबाद विभागातील भिकनूर-तळमडला सेक्शन, अक्कमपेठ-मेदक सेक्शन या मार्गांवर मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी पाणी साचल्याने सर्वच रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या. दक्षिण मध्य रेल्वे अंतर्गत काही रेल्वे पटरीवरून पाणी वाहू लागल्याने वाहतुकीस रेल्वे विभागाने मनाई दर्शवली. त्याबरोबरच धर्माबाद-निझामाबाद-कामारेड्डी या रेल्वे स्थानकाच्या पटरीखालून गिट्टी वाहून गेल्याने रेल्वेसेवा पूर्णपणे विस्कळीत झाली. अनेक रेल्वेंचे मार्ग वळविण्यात आले. मुंबईहून सिकंदराबादला जाणारी देवगिरी एक्स्प्रेस निजामाबादपासून वळविण्यात आली होती. तेलंगणात जाणाऱ्या काही गाड्या अंशिक रद्द करण्यात आल्या होत्या.मागच्या आठवड्यात मराठवाड्यातील अनेक मंडळात अतिवृष्टी व मुसळधार पाऊस झाला. मराठवाड्यातील ६ लाख ६२ हजार हेक्टरवरील शेत पिकांचे मोठे नुकसान झाले. मागील पंधरा दिवसांत झालेल्या नुकसानीचे पंचनामे शिल्लक असतानाच मराठवाड्यातील लातूर व नांदेड जिल्ह्यात पुन्हा एकदा आभाळ फाटले. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचे या पूर्वीच सर्वाधिक नुकसान झाले. जवळपास ३ लाख हेक्टरवरील पिके बाधीत झाल्याची शासन दफ्तरी नोंद आहे. मराठवाडा विभागात यंदा पावसाळ्यात आतापर्यंत ४१ व्यक्तींचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. त्यामधील सर्वाधिक १५ जणांचा समावेश नांदेडचाच आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात ११ जणांचा मृत्यू झाला. मराठवाडा विभागात आतापर्यंत यंदाच्या पावसाळ्यात ९२७ जनावरे दगावली असल्याची नोंद आहे.

मराठवाड्यात या पावसाळ्यात १ हजार ८८७ घरांची पडझड झाल्याची नोंद आहे. अद्याप शेतकऱ्यांना संपूर्ण मदत पोहोचलेली नसतानाच निसर्गाने रौद्ररूप धारण करून मराठवाड्यात पुन्हा जलसंकट निर्माण केले. हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी, औंढा नागनाथ, सेनगाव व वसमत तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. कयाधू नदीच्या पुरात एक अठरा वर्षीय तरुण वाहून गेल्याने चिंता व्यक्त करण्यात आली. शेख अरबाज शेख फिरोज असे त्या तरुणाचे नाव आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, पालम व पूर्णा तालुका संपूर्ण जलमय झाला होता. येलदरी व निम्न दुधना प्रकल्पाचे दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग करावा लागला. परभणी जिल्ह्यात नदीनाल्यांना पूर आल्यानंतर संपूर्ण शेत शिवार पाण्याखाली गेले होते. बीड जिल्ह्यातही पावसाने हाहाकार उडाला. त्या ठिकाणी १४ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याची नोंद आहे, तर दीड लाख हेक्टर खरीप पिके पाण्याखाली गेल्याची शासन दरबारी नोंद आहे.

# मृत्यूचे भय नाही


एखदा एका राज्याच्या महाराणीचा हिऱ्यांचा हार हरवला. हा हार राणीचा जीवापेक्षा प्रिय होता. यामुळे तिने त्यास शोधण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु तो कुठेही सापडला नाही. हारासाठी राणी परेशान झाल्याचे पाहून राजाने दवंडी दिली की, ज्या कोणालाही हा हार सापडला असेल त्याने तीन दिवसांच्या आत परत करावा, अन्यथा त्याला मृत्यूदंड देण्यात येईल.

योगायोगाने तो हार एका साधूला मिळाला. त्याच्या मनात हाराविषयी कसलेही आकर्षण नव्हते. परंतु त्याने या विचाराने तो हार स्वत:कडेच ठेवला की, हा हार शोधत-शोधत कुणीतरी त्याच्याकडे येईल आणि नंतर त्यास तो हार देवून टाकेल. दुसऱ्या दिवशी त्याने राज्याची दवंडी ऐकली परंतु तो हार देण्यास न जाता तपश्चर्येत तल्लीन राहिला. राजाच्या दवंडीनुसार तीन दिवस उलटले होते. चौथ्या दिवशी तो साधू हार घेऊन राजादरबारात पोहोचला. तेव्हा राजाला माहीत झाले की हार तीन दिवसांपासून साधूच्या जवळ होता तरीही तो देण्यास आला नाही. त्यामुळे राजाला राग आणि त्याने साधूला प्रश्न केला तू माझी दवंडी ऐकली नव्हतीस. त्यावर साधून उत्तर दिले, ऐकली होती परंतु मी हार परत करण्यास पूर्वीच आलो असतो तर लोकांनी विचार केला असता की, साधू असतानाही मरणाला घाबरून हार देण्यास आला आहे. तेव्हा राजाने विचारले आज चौथ्या दिवशी का आलास. त्यावर साधू म्हणाला मृत्यूची भीती नाही, परंतु कुणा दुसऱ्यांची संपत्ती मी आपल्याजवळ ठेवणे पाप समजतो. हारासारख्या छोट्या गोष्टीशी मला काहीही घेणेदेणे नाही. साधूचे हे बोलणे एकून राजाने शर्मेने मान खाली केली. सोबतच राणीला आपल्या चुकीची कल्पना झाली आणि तिने तो हार विकून त्यापासून मिळालेले पैसे गरीबांना वाटून टाकले.



## पौष्टिक खा, फिट राहा!

### डॉक्टर टीप्स



नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...

स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे ह्रदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.

(**क्रमशः**)




## विनोद

राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले ?

राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश


Tourist = Ye kiska kankaal hai..?

Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..

Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?

Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा:
साात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

## उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

## आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

## उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### सुरेश रैनानंतर आता शिखर धवन ईडी च्या रडारवर, कसून चौकशी होणार

नवी दिल्ली-राजकारणी आणि व्यवसायिकांनंतर आता भारतीय क्रिकेटर्स सुद्धा ए च्या रडारवर आल्याचं पाहायला मिळतंय. काही दिवसांपूर्वी सुरेश रैनाला सुद्धा प्रवर्तन निदेशालयने चौकशीसाठी बोलवलं होतं. त्यानंतर आता भारताचा माजी क्रिकेटर शिखर धवनला सुद्धा ए कडून चौकशीसाठी नोटीस पटवण्यात आली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार प्रवर्तन निदेशालयने गुरुवारी ४ सप्टेंबर रोजी चौकशीसाठी प्रवर्तन निदेशालयच्या कार्यालयात बोलवलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार शिखर धवननंतर सुरेश रैनाला सुद्धा पुन्हा एकदा प्रवर्तन निदेशालय कार्यालयात बोलवण्यात येणार आहे.

नेमकं प्रकरण काय?

मीडिया रिपोर्ट्सनुसार प्रवर्तन निदेशालयाने 'वन एक्स बेट' या बेटिंग ॲपशी संबंधित चौकशीच्या प्रकरणी शिखर धवनला चौकशीसाठी बोलवलं आहे. असं मानलं जातंय की माजी भारतीय फलंदाज शिखर धवन काही जाहिरातींद्वारे या बेटिंग ॲपशी जोडला गेला होता. ईडी संपूर्ण प्रकरणावर शिखरकडून स्पष्टीकरण घेऊन चौकशी करू इच्छिते. यापूर्वी सुद्धा अनेक खेळाडू या प्रकरणात अडकलेले आहेत. यामध्ये आणखी अनेक हाय प्रोफाइल व्यक्तींचाही सहभाग असू शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे. इतकेच नाही तर या ॲपवर अनेक गुंतवणूकदारांची फसवणूक आणि कोट्यवधी रुपये लुटल्याचा आरोप आहे.

***

### 'धोनी आणि जोकोविचची हुक्का पार्टी', युएस ओपनमधील माहीचा फोटो होतोय व्हायरल; चाहत्यांच्या भन्नाट प्रतिक्रिया

नवी दिल्ली-एम एस धोनी आणि हुक्का हा सोशल मीडियावर चर्चेचा विषय झाला आहे. इरफान पठाणने केलेल्या वक्तव्यामुळे हुक्का आणि धोनी चर्चेत आलं आहे. यादरम्यान धोनी युएस ओपनचा सामना पाहण्यासाठी पोहोचल्याचे फोटो व्हायरल होत आहेत. यूएस ओपन २०२५मधील नोवाक जोकोविचचा सामना पाहण्यासाठी धोनीने हजेरी लावली होती. दरम्यान चाहत्यांनी या फोटोसहधोनी युएस ओपन २०२५ चा उपांत्य फेरीचा सामना पाहताना दिसला. या सामन्यात जगातील सातव्या क्रमांकाचा खेळाडू नोवाक जोकोविचने टेलर फ्रिट्झचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. उद्योगपती हितेश संघवी यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर धोनीबरोबरचा एक फोटो आणि जोकोविचच्या सामन्याची क्लिप शेअर केली. या क्वार्टरफायनल सामन्यात जोकोविचने फ्रिट्झचा ६-३, ७-५, ३-६, ६-४ असा पराभव केला.

जोकोविचने या हंगामात चारही प्रमुख स्पर्धांमध्ये किमान उपांत्य फेरी तरी गाठली आहे. उपांत्य फेरीत त्याचा सामना कार्लोस अल्काराझशी होईल, ज्याला त्याने गेल्या वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पराभूत करत सुवर्णपदक जिंकले होते. त्यानंतर या वर्षी जानेवारीमध्ये तो ऑस्ट्रेलियन ओपनच्या क्वार्टर फायनलमधून बाहेर पडला. जोकोविचचा २२ वर्षीय खेळाडूविरुद्ध ५-३ असा विक्रम आहे.दरम्यान धोनीसह नोवाक जोकोविचचा एक फोटोही व्हायरल होत आहे. यावर चाहत्याने धोनी आणि नोवाक जोकोविच सामना संपल्यानंतर एकत्र हुक्का पार्टी केल्याचं म्हटलं आहे.

***

### आशिया चषकासाठी युएईचा संघ जाहीर, भारतीय वंशाच्या बऱ्याच खेळाडूंचा समावेश; कर्णधार पाकिस्तानचा खेळाडू

दिल्ली-आशिया चषक २०२५ येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे, यावेळी ही स्पर्धा टी-२० स्वरूपात खेळवली जाईल. यावेळी एकूण ८ संघ आशिया चषकात खेळताना दिसणार आहेत. या ८ संघांची विभागणी दोन गटांमध्ये केली जात आहे. आता युएईच्या संघाने आपला संघ जाहीर केला आहे. ज्यामध्ये अनेक भारतीय वंशाचे खेळाडूदेखील आहेत. आणि पाकिस्तानी वंशाच्या खेळाडूंनाही संधी देण्यात आली आहे.

युएईच्या संघात १७ खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. या संघाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी मोहम्मद वसीमच्या खांद्यावर दिली आहे. मोहम्मद वसीम हा पाकिस्तानचा खेळाडू आहे. तर भारतीय वंशाचे ४-५ खेळाडू संघात आहेत.

युएईने आशिया चषकामध्ये जाहीर केलेल्या संघामध्ये वेगवान गोलंदाज मतिउल्लाह खान आणि डावखुरा फिरकी गोलंदाज सिमरनजीत सिंग या दोन खेळाडूंचे पुनरागमन झालं आहे. या दोन्ही खेळाडूंना यूएईमध्ये खेळल्या जाणाऱ्या तिरंगी मालिकेसाठी संघात स्थान देण्यात आले नव्हते, परंतु या दोन्ही खेळाडूंची आशिया चषकासाठी निवड झाली आहे. युएई संघ ९ वर्षांनंतर आशिया चषकामध्ये सहभागी होणार आहे.

घरच्या मैदानावर खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेत, यूएईला त्यांच्या खेळाडूंकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असेल, ज्यामध्ये बहुतेकांच्या नजरा गोलंदाजीत जुनैद सिद्दीकीवर असतील.

***

### भारताच्या युकी भांब्रीने युएस ओपनमध्ये घडवला इतिहास, कारकिर्दीत पहिल्यांदाच

दिल्ली-सध्या यूएस ओपन २०२५ स्पर्धा खेळवली जात आहे. या स्पर्धेत भारताच्या टेनिसपटूने इतिहास घडवला आहे. ज्युनियर गटात ऑस्ट्रेलियन ओपन ग्रँड स्लॅम जिंकणारा भारताचा युकी भांब्रीने त्याचा जोडीदार न्यूझीलंडचा मायकेल व्हीनससह पहिल्यांदाच ग्रँड स्लॅम पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.युकी आणि व्हीनस यांनी ११ व्या मानांकित निकोला मेकटिक आणि राजीव राम यांचा ६-३, ६-७, ६-३ असा पराभव केला. यापूर्वी त्यांनी केव्हिक क्रॉविट्झ आणि टिम पुएट्झ या चौथ्या मानांकित जर्मन जोडीचा पराभव केला होता. दुखापतींमुळे टेनिस एकेरी सोडल्यानंतर ३३ वर्षीय भांब्री दुहेरीवर लक्ष केंद्रित करत आहे.जगातील माजी ज्युनियर नंबर वन खेळाडू भांब्रीची ही सिनियर ग्रँड स्लॅममधील सर्वोत्तम कामगिरी आहे. यासह, भांब्रीने लिएंडर पेस, महेश भूपती आणि रोहन बोपण्णा यांच्यानंतर पुरुष दुहेरीत भारताचे वर्चस्व कायम ठेवले आहे. आता भांब्री आणि व्हीनस यांचा सामना सहाव्या मानांकित ब्रिटनच्या जो सॅलिसबरी आणि नील स्कुप्सकी यांच्याशी होईल.तत्पूर्वी, युकी भांब्री आणि मायकेल व्हीनस या जोडीने प्री-क्वार्टर फायनलमध्ये जर्मनीच्या केविन क्रॉविट्झ आणि टिम पुएट्झ या जोडीचा ६-४, ६-४ असा पराभव केला. १४ व्या मानांकित इंडो-किवी जोडीला हा सामना जिंकण्यासाठी एक तास आणि २३ मिनिट लागली. ३३ वर्षीय युकी भांब्रीच्या कारकिर्दीवर दुखापतींचा मोठा परिणाम झाला.

## धोनीने शोधलेला हिरा पुन्हा लकाकला, ठोकले दमदार शतक




दिल्ली-दुलीप ट्रॉफीच्या दुसऱ्या सेमी फायनल सामन्यात वेस्ट झोनचा स्टार फलंदाज ऋतुराज गायकवाडने कमाल केली आहे. ऋतुराज गायकवाडने जबरदस्त शतक झळकावलं आहे. गायकवाडने शतक पूर्ण करताना १३ चौकार ठोकले. गायकवाडचं शतक यासाठी सुद्धा खास आहे कारण सेंट्रल झोन विरुद्ध खेळताना वेस्ट झोनने त्यांच्या दोन स्टार फलंदाजांची विकेट गमावली होती. यशस्वी जयस्वाल आणि श्रेयस अय्यर हे दोघे पहिल्यांदा फेल झाले होते. जयस्वाल फक्त ४ धावा करू शकला आणि श्रेयस अय्यर थोडा सेट होत होता तेवढ्यात तो २५ धावा करून बाद झाला.

ऋतुराज गायकवाडने केली कमाल :

ऋतुराज गायकवाडने दुलीप ट्रॉफीच्या सेमी फायनलमध्ये आपल्या अंदाजात खेळत असताना काही चौकार सुद्धा ठोकले. रिस्क न घेता गायकवाडने ७० पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने शतक ठोकलं. त्याने त्याच्या फर्स्ट क्लास क्रिकेटच्या कारकिर्दीत आठव्यांदा शतक झळकावले. गायकवाडसोबत श्रेयस अय्यरही चांगली फलंदाजी करत होता, त्याने चार चौकार मारले पण वेगवान फलंदाजी करण्याच्या प्रयत्नात तो २८ चेंडूत २५ धावांवर बोल्ड झाला. पण गायकवाड मात्र क्रीजवर टिकून राहिला आणि लंचनंतर त्याने शतकपूर्ण केलं.

आशिया कपमध्ये नाही दिली संधी :

९ सप्टेंबर पासून आशिया कप २०२५ स्पर्धेला सुरुवात होणार आहे. वर्ल्ड कप २०२६ च्या पार्श्वभूमीवर आशिया कप यंदा टी २० फॉरमॅटमध्ये खेळवला जाणार आहे. ऋतुराज गायकवाडला आशिया कपसाठी टीम इंडियात संधी मिळण्याची अपेक्षा होती. परंतु बीसीसीआयच्या सिलेक्शन कमिटीने त्याचा १५ खेळाडूंच्या भारतीय संघात समावेश केला नाही. ऋतुराज गायकवाड हा आयपीएलमध्ये चेन्नई सुपरकिंग्सचा कर्णधार आहे.

आर्या देसाई आणि ऋतुराजची पार्टनरशिप :

यशस्वी जयस्वाल हा केवळ ३ बॉल खेळून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर हार्विक देसाई सुद्धा दीपक चहरच्या गोलंदाजीवर बाद झाला. यानंतर, आर्य देसाईने ऋतुराजसोबत ८२ धावांची भागीदारी केली ज्यामुळे वेस्ट झोनच्या संघाला सुरुवातीच्या अडचणींमधून सावरण्यास मदत झाली.



न्यूयॉर्क अमेरिकेत सुरू असलेल्या यूएस ओपन टेनिस चॅम्पियनशिपमध्ये चौथ्या फेरीच्या महिला दुहेरी सामन्यादरम्यान अमेरिकेच्या कोको गॉफने रिटर्न शॉट मारला.

### रुममध्ये घुसली अन् लैंगिक शोषणाचा आरोप...खेळाडूसोबत झालेला खळबळजनक प्रसंग

दिल्ली-टीम इंडियाचा ४२ वर्षीय लेग स्पिनर अमित मिश्रा याने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून आज निवृत्तीची घोषणा केली आहे. या घोषणेनंतर अमित मिश्राच्या क्रिकेटींग करिअरची प्रचंड चर्चा रंगली आहे. या दरम्यान अमित मिश्राची एक कॉन्ट्रोवर्सी देखील समोर आली आहे. ज्यामध्ये भारताच्या स्टार खेळाडूवर लैंगिक शोषणाचे आरोप झाले होते. त्यामुळे हे संपूर्ण प्रकरण काय आहे?हे जाणून घेऊयात. टीम इंडियाच्या अमित मिश्रावर एका महिलेचे लैंगिक शोषण केल्याचा आणि तिला शिविगाळ केल्याचा आरोप करण्यात आला होता. या आरोपांचा अमित मिश्राच्या क्रिकेट करिअरवर मोठा परिणाम झाला होता. तसेच या प्रकरणाची त्यावेळेस खूप चर्चा रंगली होती.



न्यूयॉर्क अमेरिकेत सुरू असलेल्या यूएस ओपन टेनिस चॅम्पियनशिपमध्ये चौथ्या फेरीच्या पुरुष एकेरीच्या सामन्यादरम्यान कझाकस्तानच्या अलेक्झांडर बुब्लिकने रिटर्न शॉट मारला.

## अय्यर-सूर्याच्या कॅप्टन्सीचा वाद चिघळला, भारतीय क्रिकेटपटू भडकला!

मुंबई,-श्रेयस अय्यरची आशिया कपसाठी टीम इंडियात निवड न झाल्यामुळे निवड समिती तसंच कर्णधार सूर्यकुमार यादव आणि कोच गौतम गंभीर याच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका होत आहे. तसंच भविष्यात श्रेयस अय्यर सूर्यकुमार यादवची जागा घेऊन भारताच्या टी-२० टीमचा कर्णधार होईल, असा दावाही अनेक जण करत आहेत, पण भारताचा फास्ट बॉलर संदीप शर्मा याने या दाव्यात काही अर्थ नसल्याची प्रतिक्रिया दिली आहे. आयपीएलमध्ये तुम्ही फ्रँचायझीचे नेतृत्व कसं केलं आहे? हे पाहून भारताच्या टी-२० टीमचा कर्णधार निवडणं ही चर्चा मूर्खपणाची आहे, असं संदीप शर्मा म्हणाला आहे. आयपीएलच्या सलग दोन हंगामात अय्यरने कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्जना त्याच्या नेतृत्वात फायनलला पोहोचवले, यात त्याने केकेआरला चॅम्पियन बनवलं. २०२० मध्येही श्रेयस अय्यरने दिल्ली कॅपिटल्सचं नेतृत्व केलं आणि आयपीएल इतिहासात पहिल्यांदाच दिल्ली फायनलमध्ये पोहोचली. आयपीएल २०२५ मध्ये श्रेयस अय्यरने बॅटिंगमध्येही धमाका केला. या मोसमात त्याने १७५.०७ च्या स्ट्राईक-रेटने ६०० पेक्षा जास्त रन केल्या. तरीही अय्यरची आशिया कप २०२५ साठी



भारतीय टीममध्ये निवड झाली नाही.

मअय्यर त्याच्या टीमला फायनलमध्ये घेऊन गेला, म्हणून तो भारताचा कर्णधार होऊ शकतो, ही चर्चा निरर्थक आहे. सूर्या आयपीएलमध्ये कोणत्याही टीमचं नेतृत्व करत नाही, तरीही तो भारताच्या टी-२० टीमचा कर्णधार आहे. टीम इंडियाचा कर्णधार होण्यासाठी आयपीएल कर्णधार असण्याचा निकष नाही. मागच्या ३ वर्षांपासून रोहित कोणत्याही फ्रँचायझीचा कर्णधार नाही, तरी त्याने भारताला २०२४ चा टी-२० वर्ल्ड कप जिंकवला. तो अजूनही भारताच्या वनडे टीमचा कर्णधार आहे, म्हणून तुम्ही आयपीएलमध्ये काय करता हा निकष असू शकत नाहीफ, असे संदीप शर्मा म्हणाला आहे.

संदीप शर्मा याने जुलै २०१५ मध्ये भारतासाठी दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले. तसंच तो अजूनही आयपीएलमध्ये खेळत आहे. आयपीएल २०२५ मध्ये संदीप शर्मा राजस्थान रॉयल्सकडून खेळला. तसंच तो आयपीएलमध्ये आतापर्यंत ३ टीमकडून खेळला आहे.

मआयपीएल पूर्णपणे वेगळी आहे. ती एक देशांतर्गत लीग आहे. त्याप्रमाणे, बीसीसीआयची स्वत:चीही एक देशांतर्गत लीग आहे. जेव्हा तुम्ही आंतरराष्ट्रीय टीम निवडता तेव्हा तुम्ही १५ जणांची निवड करता. म्हणजे तुम्ही असा कर्णधार निवडता जो १५ जणांचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे करेल. इथे आयपीएलमध्ये, तुमच्याकडे बरेच देशांतर्गत खेळाडू आहेत, बरेच तरुण खेळाडू आहेत. त्यापैकी काही परदेशातून येतात. पण इथे तुम्ही अशा व्यक्तीची निवड करत आहात जो १५ जणांचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे करेलफ, असं वक्तव्य संदीप शर्माने केलं आहे.

ममला वाटते की हा वाद निरर्थक आहे. या दोन्ही टीम पूर्णपणे वेगळ्या आहेत. भारतीय टीम पूर्णपणे वेगळी आहे. आयपीएल टीम पूर्णपणे वेगळी आहे. मला वाटते की लोकांनी शिकण्याची गरज आहे. लोकांनी टिप्पणी करण्यापूर्वी या गोष्टीबद्दल अधिक समजून घेण्याची आवश्यकता आहेफ, असे संदीप शर्मा म्हणाला.

## आयपीएल महाग, पण टीम इंडियाला सूट

**जिएसटी बदलानंतर किती रुपयांना मिळणार मॅचचे तिकीट?**

मुंबई-आयपीएलच्या पुढच्या मोसमासाठी भारतीय क्रिकेट रसिकांना तिकीटासाठी जास्त पैसे मोजावे लागणार आहेत, कारण सरकारने या सामन्यांच्या तिकीटांवरचा जीएसटी २८ टक्क्यांवरून ४० टक्के केला आहे. बुधवारी केंद्र सरकारने जीएसटीमध्ये क्रांतीकारी बदल केले, त्यामुळे आता कॅसिनो, रेस क्लब तसंच आयपीएल सारख्या क्रीडा स्पर्धांच्या तिकीटासाठी ४० टक्के जीएसटी द्यावा लागेल, असं अर्थमंत्रालयाने स्पष्ट केलं आहे.आयपीएलच्या गेल्या हंगामापर्यंत ५०० रुपयांच्या मूळ किमतीच्या आयपीएल तिकिटाची किंमत २८ टक्के जीएसटीसह ६४० रुपये होती. पण, २०२६ च्या हंगामात सरकारने ४० टक्के जीएसटी लादल्यानंतर, आता त्याच तिकिटाची किंमत ७०० रुपये असेल. कारण आयपीएल तिकिटांना लक्झरी वस्तूंच्या श्रेणीत वर्गीकृत करण्यात आले आहे.पण भारताच्या आंतरराष्ट्रीय सामन्यांचे वर्गीकरण इतर क्रीडा स्पर्धांमध्ये करण्यात आले आहे, त्यामुळे ५०० रुपयांपेक्षा जास्त




किमतीच्या तिकिटांवर १८ टक्के जीएसटी लागेल. ५०० रुपयांपेक्षा कमी किमतीच्या कोणत्याही तिकिटावर जीएसटी लावला जाणार नाही. अशा परिस्थितीत, भारतीय क्रिकेट टीमच्या सामन्यात चाहत्यांना निश्चितच दिलासा मिळेल, पण आयपीएलसाठी मात्र त्यांना जास्त पैसे मोजावे लागतील.ममान्यताप्राप्त क्रीडा स्पर्धांसह इतर क्रीडा स्पर्धांमध्ये प्रवेशावर सवलत सुरू राहील जिथे तिकिटाची किंमत ५०० रुपयांपेक्षा जास्त नसेल. आणि जर तिकिटाची किंमत ५०० रुपयांपेक्षा जास्त असेल, तर त्यावर १८ टक्के मानक दराने कर आकारला जाईलफ, असं नियमांमध्ये म्हटले आहे. आयपीएलचा विचार केला तर बीसीसीआयचे तिकिटांच्या किमतींवर कोणतेही नियंत्रण नाही. आयपीएल तिकीटाच्या किंमती प्रत्येक फ्रँचायझी त्यांच्या



थायलंडमधील बँकॉक येथे सुरू असलेल्या व्हॉलीबॉल महिला जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत अमेरिका आणि कॅनडाच्या सहभागी होताना महिला खेळाडू.

## आशिया कपमध्ये कोण असणार भारताचा स्पॉन्सरर ?

मुंबई : आशिया कप स्पर्धेपूर्वी संसदेत एक बिल पास झाले आणि बीसीसीआयच्या जर्सी स्पॉन्सरला गाशा गुंडाळावा लागला. ऑनलाईन गेमिंग संदर्भातील बिल पास झाल्याने ड्रीम इलेव्हनचा बाजार उठला. त्यामुळे बीसीसीआय आणि ड्रीम ११ यांच्यातील करार रद्द झाला आहे. खरे तर हा करार २०२६ पर्यंत होता. पण एका वर्षाआधीच हा करार संपुष्टात आला आहे. आता बीसीसीआय नव्या स्पॉन्सरच्या शोधात आहे. आशिया कप स्पर्धेच्या तोंडावर बीसीसीआयची नव्या स्पॉन्सरसाठी शोधाशोध सुरु झाली आहे. मात्र बीसीसीआयला आपल्या मनासारखा स्पॉन्सर काही मिळालेला नाही. त्यामुळे भारतीय संघ आशिया कप स्पर्धेत जर्सीवर विना स्पॉन्सर उतरण्याची शक्यता आहे. अस असताना बीसीसीआयने एक मोठा निर्णय घेतला आहे. रिपोर्टनुसार, बीसीसीआयने भारतीय संघाला स्पॉन्सर करण्यासाठी बेस प्राईस वाढवली आहे.

## मी आजपासून निवृत्ती घेतोय..., अमित मिश्राची घोषणा

दिल्ली-भारतीय क्रिकेटपटू अमित मिश्रा याने सर्व प्रकारच्या क्रिकेट फॉरमॅटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत अमित मिश्राने निवृत्तीची घोषणा केली. अमित मिश्राने भारतासाठी २२ कसोटी, ३६ एकदिवसीय आणि १० टी-२० सामने खेळले आहेत. अमित मिश्राने कसोटीत ७६, एकदिवसीय सामन्यात ६४ आणि टी-२० मध्ये १६ विकेट्स घेतल्या आहेत.

निवृत्तीची घोषणा करताना अमित मिश्रा काय म्हणाला?

आज, २५ वर्षांनंतर, मी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करतो, हा खेळ माझे पहिले प्रेम, माझे शिक्षक आणि माझ्या आनंदाचा सर्वात मोठा स्रोत आहे. हा प्रवास असंख्य भावनांनी भरलेला आहे. मी बीसीसीआय, हरियाणा क्रिकेट असोसिएशन, माझे प्रशिक्षक, सहाय्यक कर्मचारी, सहकारी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे चाहत्यांचा मनापासून आभारी आहे, ज्यांच्या विश्वासाने आणि पाठिंब्याने मला प्रत्येक पावलावर बळ दिले. सुरुवातीच्या दिवसांच्या संघर्ष आणि त्यागांपासून ते मैदानावरील अविस्मरणीय क्षणांपर्यंत, प्रत्येक अध्याय हा एक अनुभव आहे ज्याने मला एक क्रिकेटपटू आणि



एक माणूस म्हणून घडवले आहे. चढ-उतारांमध्ये माझ्यासोबत खंबीरपणे उभे राहिल्याबद्दल माझ्या कुटुंबाचे आभार. हा प्रवास इतका खास बनवल्याबद्दल माझ्या सहकाऱ्यांचे आणि मार्गदर्शकांचे आभार. हा अध्याय संपवताना, माझे हृदय कृतज्ञता आणि प्रेमाने भरले आहे. क्रिकेटने मला सर्व काही दिले आहे आणि आता मी या खेळाला काहीतरी परत देण्यास उत्सुक आहे, असे अमित मिश्रा म्हणाला.

अमित मिश्राची कारकीर्द-

अमित मिश्राने २००३ मध्ये बांगलादेशमध्ये झालेल्या एकदिवसीय मालिकेतून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. २००८ मध्ये मोहाली येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध अमित मिश्राने कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. या सामन्यात त्याने पाच विकेट्स घेतल्या. २०१३ मध्ये अमित मिश्राने झिम्बाब्वेविरुद्धच्या पाच सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १८ विकेट्स घेत जवागल श्रीनाथच्या विश्वविक्रमाशी बरोबरी केली. २०१४ मध्ये बांगलादेशमध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकातही अमित मिश्राने भाग घेतला. या विश्वचषकांत अमित मिश्राने १० विकेट्स घेतल्या. २०१७ मध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळल्यानंतर, अमित मिश्राने देशांतर्गत क्रिकेट आणि आयपीएल खेळणे सुरू ठेवले. अमित मिश्राने आयपीएल २०२४ मध्ये लखनौ सुपर जायंट्सकडून राजस्थान रॉयल्सविरुद्ध शेवटचा सामना खेळला होता.

गेल्या ७ दिवसांत तीन क्रिकेटपटूंनी केली निवृत्तीची घोषणा-

गेल्या ७ दिवसांत तीन क्रिकेटपटूंनी निवृत्तीची घोषणा केली आहे. २७ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय क्रिकेट संघाचा माजी खेळाडू रवीचंद्रन अश्वीनने आयपीएलमधून निवृत्तीची घोषणा केली. तर २ सप्टेंबर २०२५ रोजी पाकिस्तान क्रिकेट संघाचा खेळाडू आसिफ अलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली. त्यानंतर आज ४ सप्टेंबर २०२५ रोजी भारतीय संघाचा खेळाडू अमित मिश्राने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती घोषणा केली.

# श्री गणेश विसर्जनासाठी महापालिकेची तयारी पूर्ण

- शहरवासियांसाठी १५ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र
- ४३० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती
- मूर्ती संकलन केंद्रातच देण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** प्रदुषण टाळण्यासाठी शहरातील नागरिकांनी आपाल्या घरी स्थापित केलेल्या गणेश मूर्तीचे विसर्जन जलाशयात न करता मनपाच्या संकलन केंद्रांकडे त्या मुर्ती द्याव्यात.सार्वजनिक गणेश मंडळांनी १२ नंबर पाटी येथील खदानीत विसर्जन करावे,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.मुर्ती संकलनासाठी पालिकेकडून ४३० अधिकारी,कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दि. २७ ऑगस्ट रोजी स्थापित केलेल्या श्रीगणेशाचे शनिवारी (दि.६ सप्टेंबर ) विसर्जन होणार आहे.शहरातील नागरिक व भक्त गणरायाला निरोप देणार आहेत.प्रथेप्रमाणे श्रीगणेशाच्या मुर्तीचे जलाशयात विसर्जन केले जाते.गेल्या कांही वर्षापासुन मनपा गणेश मूर्ती संकलन केंद्र कार्यान्वित करते. गणेशभक्तांनी आपल्या मुर्ती संकलन केंद्रात देण्याचे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

सार्वजनिक गणेश मंडळांना आपल्या मोठ्या मूर्तीचे १२ नंबर पाटी जवळील खदानीत विसर्जन करता येणार आहे.यासाठी संबंधित मंडळांनी स्वतः च्या वाहनाने मूर्ती तेथपर्यंत आणाव्यात.श्री सिध्देश्वर मंदीर परिसर,कव्हा रोड, बांधकाम भवन या ठिकाणी मिरवणुकी नंतर श्री गणेश मुर्तीचे संकलन करण्यात येणार आहे.

घरगुती गणेश मंडळांसाठी मनपाकडून शहरात ठिकठिकाणी संकलन केंद्र उभारण्यात आली आहेत.या ठिकाणी मनपाचे कर्मचारी दिवसभर उपस्थित राहून मुर्तीचे संकलन करणार आहेत.याच केंद्रावर निर्माल्य संकलन करण्यासाठी कलश ठेवण्यात येणार आहेत.नांदेड रस्त्यावर यशवंत शाळा,विवेकानंद चौकातील पाण्याची टाकी,मंठाळे नगरमध्ये मनपा शाळा क्रमांक ९, सिध्देश्वर मंदिर, जिल्हाधिकारी कार्यालया जवळील शासकीय विहीर,बार्शी रस्त्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची पाण्याची टाकी,दयानंद महाविद्यालयाचा पार्किंग परिसर,सरस्वती कॉलनीतील पाण्याची टाकी,टाऊन हॉल, बांधकाम भवन,कव्हा रस्त्यावर खंदाडे नगर, साळे गल्लीतील यशवंत शाळा,तिवारी यांची विहीर,गणेश नगर व काशी विश्वेश्वर मंदिर ग्रीन बेल्टसिद्धेश्वर मंदिर, गणेश चौक सार्वजनिक गणेश मंदिर या ठिकाणी यावर्षी मूर्ती संकलन केंद्र उभारली जाणार आहेत.



गणेश मूर्ती विसर्जन सुरळीत व्हावे यासाठी चार नोडल अधिकारी १७ पथक प्रमुख व ४०९ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्री गणेश विसर्जना वेळी आपल्याकडील गणेश मूर्ती मनपाने उभारलेल्या संकलन केंद्रात द्याव्यात. पालिकेकडून या सर्व मूर्तींचे १२ नंबर पाटीवरील खदानीत विधीवत विसर्जन केले जाणार आहे.नागरिक व गणेश भक्तांनी या उपक्रमात मनपाला सहकार्य करावे,,असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्रीमंत केसरी गणेश मंडळांच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील औसा रोड भागातील श्रीमंत केसरी गणेश मंडळांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी लातूर शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय पथकाने सहकार्य केले.

श्रीमंत केसरी गणेश मंडळ आणि लातूर शहर महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी, रक्त तपासणी करण्यात आली. तसेच आयुष्यमान कार्ड मोफत काढून देण्यात आले. सकाळी ११ वाजता या शिबीरास प्रारंभ झाला. शिबीरासाठी महानगरपालिकेच्या वतीने डॉक्टर सोनोने स्मृति, डॉक्टर प्राजक्ता शिंदे . तसेच चौरे ए. एम, नरेश पल्लोड , राठोड बालिका, ओम प्रकाश सोळंके, शिवाजी पवार,ससाने व्ही. टी, आशाताई उज्वला पांचाळ, ज्योती तडगुरे, अंजली गायकवाड, बोडके पुष्पा, स्मिता पंडित यांनी तसेच गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. दोन तास चाललेल्या या शिबिरात ५६ जणांची तपासणी करण्यात आली

## किडीज इन्फो पार्क स्कूलच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड



**लातूर/प्रतिनिधी :** क्रीडा युवक संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर यांच्या संयुक्त वतीने आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत किडीज इन्फो पार्कच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत प्रति स्पर्धकाला हरवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली या स्पर्धेचे उद्धाटन क्रीडा अधिकारी माननीय सुरेंद्र कराड सर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडले या स्पर्धा वयोगट १४ १७ १९ अशा तीन वेगवेगळ्या गटांमध्ये संपन्न झाली वयोगट १४ मुलींमध्ये किडीज इन्फो पार्क च्या कुमारी मायरा रड्डी कुमारी संस्कृती पाटील कुमारी मनस्वी भोसलेव या विद्यार्थिनीने प्रतिस्पर्धी संघाला हरवत विजय मिळवला व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पूर्ण संघ पात्र ठरला तर १७ वर्ष वयोगट मुलांमध्येही अक्षय अळणे व समर्थ बंडे वेदांत स्वामी प्रणव पांडुळे यांनी चांगली कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली १४ वर्षे वयोगटांमध्ये तेजम पांचाळ यांनी उत्तम कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली हे १७ वर्ष मुली आधी साबदे क्षितिजा काळदाते अक्षरा इटकर श्रेया गजिले विद्यार्थी होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेत स्पर्धेसाठी पात्र ठरलेले आहेत त्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या प्राचार्य

प्रीती देवांग शहा तसेच उप प्राचार्य नयना पाटील मॅडम व शाळा समन्वयक रामेश्वर सगरे यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या त्यांना क्रीडा प्रशिक्षक प्रदीप आकनगिरे, पल्लवी राठोड अजित आडे यांचे मार्गदर्शन लाभले या सर्व विजयी खेळाडू व प्रशिक्षकांचे सर्व शिक्षक विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या .

## राज्यातील धरणे तुडुंब भरली

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसात झालेल्या दमदार पावसामुळे राज्यातील धरण साठ्यातही मोठी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी याच सुमारास ७७.३५ असणारा जलसाठा यंदा ८६.२० एवढा झालाय. मराठवाडा विदर्भ, पुणे व कोकण विभागातील बहुतांश धरणं भरली आहेत. मराठवाड्यात गेल्यावर्षीच्या तुलनेत जवळपास दुप्पट जलसाठा झालाय. जलसंपदा विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, आज राज्यभरातील लघु मध्यम व मोठ्या धरणांचा सरासरी उपयुक्त पाण्यासाठी ८६.२० टक्क्यांवर गेलाय.

गेल्या पंधरा दिवसात झालेल्या पावसामुळे राज्यभरातील नद्या नाले तुडुंब भरले .अनेक ठिकाणी पूरग्रस्त परिस्थिती निमर्ण झाली .शेतकऱ्यांची पीकं पाण्याखाली गेली. धरण क्षेत्रात झालेल्या पावसामुळे धरणांच्या पाणीपातळीतही मोठी वाढ झाली.

कोणत्या विभागात काय परिस्थिती ?

राज्यभरातील एकूण लघु मध्यम व मोठ्या अशा २९९७ धरणांमध्ये उपयुक्त पाणीसाठा ८६.२० एवढा झालाय .धरणांमधील पाणीसाठ्यात कोकण विभागाने आघाडी घेतली आहे .मोठ्या मध्यम आणि लघु अशा सर्वच प्रकारच्या धरण प्रकल्पांचा विचार करता कोकण विभागातील धरणात ९२.६५ पुणे विभागात ९१.७४ नाशिक विभाग ८०.४६ छत्रपती संभाजी नगर मध्ये ८१.३६ अमरावती विभाग ८५.०२ तर नागपूर विभागात ७८.८१ पाणीसाठा झाला आहे .

मराठवाड्यातील धरणे फुल्ल !

मराठवाड्यातील सर्वात मोठे जायकवाडी धरण ९८.६१ टक्क्यांनी भरले आहे. गेल्या वर्षी जायकवाडीत याच सुमारास ४७.६४ पाणी साठा होता.बीडचे मांजरा धरण ९८.९४ टक्क्यांवर गेले आहे तर माजलगाव धरणात ९४.७२ पाणीसाठा आहे .गेल्यावर्षी या दोन्ही धरणांमध्ये ३०.२१ व १२.२१ अनुक्रमे पाणीसाठा होता .

हिंगोलीच्या सिद्धेश्वर आणि येलदरी धरणात ९५ज्ञब च्या पुढे पाणीसाठा झाला आहे .नांदेडच्या विष्णुपुरी धरणात ८२.६८ जलसाठा झाला असून निम्नमनार धरण १०० टक्क्यांनी भरले आहे. धाराशिव मधील निम्न तेरणा प्रकल्प ९८.४७ तर सीना कोळेगाव प्रकल्प ९९.४५ भरला आहे.परभणीतील निम्न दुधना प्रकल्प ७३.३५ टक्क्यांनी भरलाय. मराठवाड्यातील एकूण ४४ धरण प्रकल्पांमध्ये ९४.३४ पाणीसाठा झालाय. हा पाणीसाठा गेल्यावर्षी ५१.७७ एवढा होता.

## दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक गौरव सोहळा व सांस्कृतिक मंडळाचे उद्घाटन



**लातूर/प्रतिनिधी :** दि. ०४ सप्टेंबर, २०२५ रोजी दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११वी/इ.१२वी मधील विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयीन शिक्षकांचा गौरव सोहळा दयानंद सभागृहात आयोजित केला. कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा दयानंद शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष माननीय श्री. संजयजी बोरा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, समन्वयक डॉ. सुभाष मोरे, प्रशासकीय अधिकारी प्रा .ऋतुजा देशमुख सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सुनिता नागरगोजे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. तसेच संगीत विभागातर्फे प्रा. ज्योतिबा बडे व विद्यार्थ्यांनी पौर्णिमा पाटील यांनी स्वागत गीत सादर केले. सर्व उपस्थित मान्यवरांचे व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक फुलसुंदर ज्ञानेश्वर या विद्यार्थ्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर आपल्या मनोगतात विद्यार्थी जीवनात गुरुतत्व याचे महत्व काय आहे याविषयी विचार व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांनी गीत गायन व नृत्य कला प्रकारचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. संजयजी बोरा यांनी अध्यक्षीय मनोगतात ''गुरु हे विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक आहेत. शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व सांगितले व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची मोलाची भूमिका किती महत्त्वाची आहे हे सांगितले व शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या आणि सांस्कृतिक मंडळाचे उद्घाटन संपन्न झाले असे घोषित केले''

या कार्यक्रमात सांस्कृतिक विभागातर्फे विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत चव्हाण, सई हजारे व अपूर्वा काळे या विद्यार्थ्यांनी केले.

कार्यक्रमाचे आभार सतीश चव्हाण या विद्यार्थ्याने केले व कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी ३० सप्टेंबरपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक कौशल्य स्पर्धा ही जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा असून, ४८ वी जागतिक कौशल्य स्पर्धा २२ ते २७ सप्टेंबर २०२६ दरम्यान चीनमधील शांघाय येथे होणार आहे. या स्पर्धे साठी महाराष्ट्रातील पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत https://www.skillindiadigital.gov.in या वेबपोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी वयोमर्यादा हा एकमेव निकष निश्चित करण्यात आला आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ५० क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असंणे आवश्यक आहे. तसेच, डिजिटल कन्स्ट्रक्शन, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सिक्युरिटी, आयसीटी नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर, ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, इंडस्ट्रियल डिझाइन टेक्नॉलॉजी, इंडस्ट्री ४.०, मेकॅट्रॉनिक्स, ऑप्टोइलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी, रोबोट सिस्टम्स इंटिग्रेशन, वॉटर टेक्नॉलॉजी, डेंटल प्रोस्थेटिक्स आणि एअरक्राफ्ट मेंटेनन्स या क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे.

या स्पर्धेच्या आयोजनाबाबत राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद (एनएसडीसी) यांच्याकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा आयोजित करून निवडलेल्या उमेदवारांची नावे जागतिक नामांकनासाठी पाठवली जातील. जिल्हास्तरीय कौशल्य स्पर्धे साठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीद्वारे निश्चित केलेल्या कौशल्य आणि पात्रता निकषांनुसार, इच्छुक आणि पात्र उमेदवार ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत https://www.skillindiadigital.gov.in या वेबपोर्टलवर नोंदणी करू शकतील.

या संधीचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त कौशल्यप्राप्त युवक-युवतींनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी यंग प्रोफेशनल दत्तात्रय कांबळे (मो. नं. ९०२८२३८४६५) यांच्याशी संपर्क साधावा किंवा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्रप्रशाला, क्रीडा संकुलासमोर, ओसा रोड, लातूर येथे प्रत्यक्ष भेट द्यावी, असेही श्री. सूर्यवंशी यांनी आवाहन केले आहे.

## शासकीय योजना थेट सर्वसामान्य जनते पर्यंत पोहोचवा - ना. बाबासाहेब पाटील

**चाकूर/प्रतिनिधी :** शासकीय योजना थेट सर्वसामान्य पर्यंत पोहोचवा यासाठी सर्वांनी प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी चाकूर येथे केले.

चाकूर येथे माझी माय मंगल कार्यालयात आयोजित ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या वतीने आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान चाकूर तालुकास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर तहसीलदार नरसिंग जाधव , गटविकास अधिकारी संतोष वंगवाडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर विवेक होळे पाटील, गटशिक्षण विकास अधिकारी मंदोदरी वाकोडे, महिला बाल विकास अधिकारी विद्या लोमटे, यशवंतराव जाधव, दयानंद सुरवसे, नागोराव पाटील, अनिल वाडकर, भानुदास पोटे, देविदास माने,गणपत कवठे, भालचंद्र चाटे, गंगाधर अक्कानवरु, मधुकर मुंडे,विष्णू तिकटे माधवराव पाटील, अशोकराव चिंते, श्रीनाथ सावंत, निलेश भंडे, संदीप शेटे,मच्छिंद्र नागरगोजे, सावता माळी, विवेक शिंदे,बळीराम भोसले,भुजंगराव शिंदे,राम फुले,महेश वत्ते, भागवत कुसंगे,नाना जाधव,नामदेव शिंगडे,सचिन तोरे, सुनील चिंताळे सह चाकूर पंचायत समितीचे विविध प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, स्थानिक स्तरावर प्रभावीपणे सर्व सरपंचांनी काम करणे गरजेचे आहे. चाकूर तालुक्यात ज्या गावात स्मशानभूमी नाही अशा सर्व गावांमध्ये प्रशासनाने पुढाकार घेऊन स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून घ्यावी शासन म्हणून आम्ही योग्य ती मदत करण्यास तयार आहोत. शासनाच्या प्रत्येक योजनेमध्ये लोकसहभाग महत्त्वाचा असून प्रत्येक गावाच्या सरपंचांनी लोकसभागासाठी अधिकाधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पंचायत समितीने घरकुलासाठी प्राधान्य देऊन जास्तीत जास्त घरकुलाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना द्यावा, त्याचबरोबर चाकूर तालुक्यात सुद्धा जलताराचा प्रकल्प राबवण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा असे आवाहनही सहकार मंत्री ना. पाटील यांनी केले.


या कार्यशाळेस चाकूर तालुक्यातील विविध गावचे सरपंच, उपसरपंच सदस्य व विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रमोद हुडगे यांनी केले.

## काहींनी राजकीय फायदा घेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला, आता सगळे गपगार पडले आहेत - अजित पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पाच दिवस मुंबईतील आझाद मैदान येथे आंदोलन केले. त्या आंदोलनाला अखेर यश आले. पण, त्या आंदोलनानंतरदेखील राजकीय वतुर्ळात अद्यापही चर्चा सुरूच आहे. तर मुंबईतील आंदोलनादरम्यान शरद पवार गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांची मराठा आंदोलकांनी गाडी अडवून जाब विचारण्याचा प्रयत्न केला होता, त्यावरून राजकीय वतुर्ळात अनेक चर्चांना उधाण आले होते.

त्या सर्व घडामोडींदरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुणे शहराच्या दौऱ्यावर होते. त्या कार्यक्रमादरम्यान अजित पवार भाषण करतेवेळी म्हणाले, जनतेने आम्हाला निवडून दिले आहे, आमच्यासोबत प्रचंड बहुमत आहे. जनतेला त्याचा फायदा झाला पाहिजे, ही भावना आमच्या सर्वांची असल्याचे सांगत ते पुढे म्हणाले, वेगवेगळे प्रसंग उद्भवतात, परंतु ते शांतपणे, सामोपचारांनी मार्ग कसा काढता येईल यासाठी प्रयत्न केले पाहिजे; पण समोरची काही लोकं टपूनच बसलेली असतात की आपण इतके कमी निवडून आलो आहोत, आपल्याला काही तरी संधी मिळाली पाहिजे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# बापूजींनी सुरू केलेल्या शिक्षणरूपी ज्ञान यज्ञात संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांचा मोलाचा वाटा

धाराशिव (प्रतिनिधी)- शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणरूपी ज्ञानयज्ञ सुरू केलेला आहे.यामध्ये अत्यंत मोलाचा वाटा संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांचा आहे.असे प्रतिपादन समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. माधव उगिले यांनी केले.

दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजी रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी प्रा. माधव उगिले बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांची तत्वे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हे गुरुदेव कार्यकर्त्यांचे काम आहे.

यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. छाया दापके,कनिष्ठ विभागाचे उपप्रचार्य प्राध्यापक बबन सूर्यवंशी,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राध्यापक विवेकानंद चव्हाण,वरिष्ठ स्टाफ सेक्रेटरी डॉ.बालाजी गुंड ,कनिष्ठ स्टाफ सेक्रेटरी प्रा. सचिन चव्हाण उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विवेकानंद चव्हाण यांनी केले तर आभार प्रा. सचिन चव्हाण यांनी मानले.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# जिल्हाधिकारी श्री.पुजार यांच्या संकल्पनेतून जनता दरबार उपक्रम



धाराशिव (जिमाका) जिल्ह्यातील नागरिकांच्या शासकीय कामकाजामधील अडचणी व तक्रारी त्वरित सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या संकल्पनेतून जनता दरबार हा उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालयासह उपविभागीय,तहसील व मंडळ स्तरावर राबविण्यात येत आहे.

नागरिकांना त्यांच्या अडचणी व तक्रारी मांडण्यासाठी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सोमवारी, बुधवारी व शुक्रवारी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत संधी उपलब्ध होणार आहे.या वेळेत उपविभागीय अधिकारी,तहसीलदार व मंडळ अधिकारी यांच्या समक्ष थेट संवाद साधता येणार असून अर्जही दाखल करता येणार आहेत.तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# भारतीय जनता पार्टी, धाराशिव शहरतर्फे गणेशोत्सव मिरवणूक स्पर्धेचे नियोजन..

धाराशिव (प्रतिनिधी)- भारतीय जनता पक्ष धाराशिव तर्फे आ.राणा जगजितसींह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व मल्हार दादा पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी आणि आयोजक शहराध्यक्ष अमीत शिंदे यांच्या माध्यमातून उत्कृष्ट शिस्तप्रिय गणेशोत्सव सादरीकरण व मिरवणुक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून प्रथम पारितोषिक रु ५१०००/- द्वितीय पारितोषिक रु ३१०००)- तृतीय पारितोषिक रु २१०००/- ठेवण्यात आले असून तीन मंडळांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्रत्येकी रु ५०००/- देण्यात येणार आहे.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून संस्कृती रक्षणाचे व समाजात ऐक्य व भक्तीभाव वृद्धिंगत करण्याचे महत्वपूर्ण कार्य होत असून त्याला प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती स्पर्धा संयोजक तथा भाजपा शहराध्यक्ष अमीत शिंदे यांनी कळविले आहे.

# २४२ कारवाया करुन १,९४,४०० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०३ सप्टेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २४२ कारवाया करुन १,९४,४०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


# महाराष्ट्र शासन
# जलसंपदा विभाग

## अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ नांदेड अंतर्गत
## कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव

**निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सुचना क्र.६ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव अंतर्गत निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) ब-१ निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य तो अनुभव असलेल्या कंत्राटदार यांच्याकडून ''ब-१'' नमुन्यातील निविदा मागवित आहेत.

निविदे बाबतचा संपूर्ण जाहिरात तपशील महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळ https://wrd.maharashtra.gov.in यावर दिसेल तसेच दिनांक **०९-०९-२०२५ ते १६-०९-२०२५** या कालावधीत ऑफलाईन निविदा खरेदी करू शकतात.

**टिप:** (सदर निविदा सूचने मध्ये ₹४.८४ लक्ष किंमतीच दोन काम आहेत.)

स्वाक्षरित/-
**(यु. ई. पेरमपल्ली)**
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग, धाराशिव**

जा.क्र./यांविधा/लेखा-४/नि.शा./२२०/ २०२५ दिनांक:-०२-०९-२०२५

जिमाका/धारा/जाहि.५३/२०२५


# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी)-येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात विज्ञान मंडळ उद्धाटनाचे औचित्य साधून एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र महाविद्यालयाचे प्र . प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. चर्चासत्रासाठी मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ.सागर डेळेकर हे लाभले होते.

यावेळी डॉ. डेळेकर म्हणाले की, विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांना करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. त्याचबरोबर नवप्रवर्तक म्हणून देखील विज्ञान क्षेत्रामध्ये खूप मोठ्या संधी उपलब्ध आहेत असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की,विज्ञान विभागात उद्योजकता विकासाला देखील खूप मोठ्या संधी उपलब्ध आहेत त्याचा विद्यार्थ्यांनी फायदा घेणे गरजेचे आहे.

चर्चासत्र विज्ञान क्षेत्रातील करिअरच्या संधी , नवप्रवर्तक आणि उद्योजकता विकास या विषयावर आयोजित करण्यात आले होते.

चर्चासत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख हे होते.

सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ.बाबासाहेब मोरे यांनी केले , पाहुण्यांचा परिचय डॉ. मंगेश भोसले यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. स्वाती शीलवंत यांनी केले तर आभार प्रा. अतुल देशमुख यांनी मानले.

चर्चासत्राला विविध महाविद्यालयातील विद्यार्थी ,प्राध्यापक आणि संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# महाराष्ट्र शासनाचे ९ वर्षे मुदतीचे १,००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई,(प्रतिनिधी)-महाराष्ट्र शासनाच्या ९ वर्षे मुदतीच्या १,००० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

९ सप्टेंबर , २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् ९ सप्टेंबर , २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान १० सप्टेंबर , २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी ९ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी १० सप्टेंबर, २०२५ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक १० सप्टेंबर २०३४ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरील दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान प्रतिवर्षी दिनांक मार्च १० आणि सप्टेंबर १० रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (डङ्ठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

# महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी घेतले महाराष्ट्र सदनात 'श्री गणेशा'चे दर्शन



नवी दिल्ली, ४ : गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात महाराष्ट्राच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी महाराष्ट्र सदन येथे श्री गणेशाचे दर्शन घेतले. निवास आयुक्त आर. विमला यांनी त्यांचे स्वयं सहायता गटांनी तयार केलेल्या पारंपरिक शालीने स्वागत केले. महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या, गेल्या २७-२८ वर्षांपासून महाराष्ट्र सदनात गणेशोत्सव साजरा होत आहे. हा उत्सव आपली संस्कृती, परंपरा आणि श्रद्धा दर्शवतो. दिल्लीत गणपतीचे दर्शन घेण्याचा आनंद मिळाला. स्वयं सहायता गटांच्या स्टॉल्सना येथे उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे, ही अभिमानाची बाब आहे.

बल्गेरियाचे भारतातील राजदूत निकोलाय यान्कोव यांनी घेतले 'श्री गणेशा'चे दर्शन

बल्गेरियाचे भारतातील राजदूत निकोलाय यान्कोव यांनीही श्री गणेशाचे दर्शन घेतले. त्यांच्यासोबत शिष्टमंडळ उपस्थित होते. निवास आयुक्त आर. विमला यांनी त्यांचे स्वागत केले. राजदूतांनी स्वयं सहायता गटाच्या प्रदर्शनाला भेट देऊन हस्तकला वस्तूंची पाहणी केली आणि खरेदीही केली. हा भारतीय संस्कृतीचा अनोखा उत्सव आहे. हा उपक्रम स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन देणारा आहे, असे यान्कोव म्हणाले. ही भेट भारत-बल्गेरिया सांस्कृतिक संबंध दृढ करेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

गणेशोत्सवाच्या आठव्या दिवशी गायक नितीन सरकटे यांचा हिंदी-मराठी भक्ती गीतांचा कार्यक्रम झाला. उपस्थितांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाराष्ट्र सदनातील गणेशोत्सवाने देश-विदेशातील मान्यवरांचे लक्ष वेधले असून, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळत आहे.

# भांडगाव स्मशानभूमीवर बेकायदेशीर अतिक्रमण व बांधकाम त्वरित थांबवा! रिपाइं (खरात) पक्षाची मागणी

धाराशिव (प्रतिनिधी)- मौजे भांडगाव, ता. परंडा, जि. धाराशिव येथील दलित समाजाच्या (बौद्ध समाज) पवित्र स्मशानभूमीवर ग्रामपंचायतकडून शासकीय योजनेच्या नावाखाली बेकायदेशीर बांधकाम सुरू करण्यात आले आहे. हा प्रकार समाजातील शांतता आणि धार्मिक भावनांना भलताच धक्का देणारा असून, भविष्यात जातीय तणाव आणि कायदा-सुव्यवस्था भंग होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात)चे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत यांनी जिल्हाधिकारी धाराशिव यांच्याकडे त्वरित आणि कठोर कारवाईची मागणी केली आहे. राऊत म्हणतात की, ग्रामपंचायत, सरपंच, ग्रामसेवक, गटविकास अधिकारी आणि शाखा अभियंते या अतिक्रमणाचे साक्षीदार असूनही ते जाणून-बुजून कटकारस्थान करीत असल्याचे म्हणणे आहे. मुख्य मागण्या: स्मशानभूमीवरील बेकायदेशीर अतिक्रमण आणि बांधकाम तात्काळ थांबवावे.

दोषींवर अतिक्रमण प्रतिबंधक कायदा १९६१,अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ आणि खझउ कलम २९५, २९५- अंतर्गत कठोर कारवाई करावी.

राऊत यांनी इशारा दिला की,योग्य ती कारवाई झाली नाही तर पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करून समाजाच्या पवित्र स्मशानभूमीचे रक्षण केले जाईल असे निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत, तालुकाध्यक्ष संपत सरवदे, आणि शिवाजी ढेरे, जनार्दन गायकवाड यांच्या सह्या आहेत.


**लातूर समाचार उस्मानाबाद**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649